कथासंग्रह

# उद्बोधन

प्रा. प्रवीण हेमचंद्र वैद्य



कवितासागर प्रकाशन

मराठी कथासंग्रह

# उद्बोधन

## प्रवीण हेमचंद्र वैद्य


कवितासागर प्रकाशन, जयसिंगपूर

**KavitaSagar Publication** **कवितासागर प्रकाशन**

Registered with the International ISBN Agency, London, UK and the Government of India, Ministry of Human Resource Development, New Delhi

- Title - **Udbodhan (उद्बोधन)**
- Author - **Pravin Hemchandra Vaidya (प्रवीण हेमचंद्र वैद्य)**
  विभूते कॉलोनी, प्लॉट # ३० ब, कोल्हापूर - वाडी बायपास रोड, जयसिंगपूर - ४१६१०१, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, संपर्क: ९७६६५८१३५३
- Year of Publication - **July 16, 2016**
- Edition's - **First**
- Volume - **One**
- Price - **Rs. 60 /-**
- Subject - Collection of Stories **(कथासंग्रह)**
- Language - **Marathi (मराठी)**
- Total **60 Pages** including covers.
- **© Pravin Hemchandra Vidya (प्रा. प्रवीण हेमचंद्र वैद्य)**
- Published in India in 2016 by - **Dr. Sunil Dada Patil**
  On Behalf of **KavitaSagar Publication, Jaysingpur**
  02322 - 225500, **9975873569, 8484986064**
  sunildadapatil@gmail.com, kavitasagarpublication@gmail.com
- Typesetting by - **Dhudat Desktop Publishing Center**
- Cover Design by - **Shrikant Shinde - Pan Graphics, Sangli**
- Printed and Bound in India by - **KavitaSagar Printing Services**
- Views expressed in this book are entirely those of the respective Authors and do not represent the opinions or thoughts of the **Publisher.**

**॥ समर्पण ॥**



**स्व. डॉ. हेमचंद्र वैद्य**

यांना त्यांच्या प्रकाशित
साहित्यकृतीस आदर्श मानून
माझे हे पहिले ग्रंथपुष्प
त्यांच्या पवित्र स्मृतीस
विनम्रतापूर्वक समर्पित करीत आहे.

**- प्रवीण हेमचंद्र वैद्य**





# मनोगत...

उद् बोधन हे माझे पहिले पुस्तक प्रकाशित होतांना मला अत्यानंद होत आहे. सेवानिवृत्ती नंतर लेखन संकल्प होताच त्याला अनुकुलता लाभली. अनेक विषयांवर सतत लेखन व प्रकाशन सुरूच होते. मनोमन पुस्तकरूपाने चोखंदळ वाचकांपुढे हे सर्व एकाचवेळी हाती पडावं व त्याचा आनंद घेता यावा या सद् हेतूने धडपड होतीच. कांही उत्कृष्ट पुस्तकांच्या प्रकाशन प्रसंगी डॉ. सुनील दादा पाटील यांचा परिचय होऊन माझ्या लेखन साहित्याला मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. अत्यंत आत्मीयतेने त्यानी पूर्ण सहकार्य केले. पहिले पाऊल टाकतांना जो शिशुआनंद अनुभवतो तो मला या निमित्ताने मिळाला. डॉ. सुनील दादा पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. संजीवनी सुनील पाटील यांचा माझ्या साहित्यकृतीत सिंहाचा वाटा आहे.

अशा साहित्य लेखनाचा छंद म्हणजेच प. पु. गुरुदेव समन्तभद्रजी आणि स्व. डॉ. हेमचंद्र वैद्य यांच्या कृपा - आशीर्वादाचा हा प्रसाद म्हणून आपण गोड करावा. माझे मार्गदर्शक व हितचिंतक आदरणीय बी. बी. गुरव यांनी समर्पक अशी प्रस्तावना लिहून या पुस्तकाची उंची वाढवली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेच समीक्षक मंगेश विठ्ठल कोळी व मुखपृष्ठ डिझायनर श्रीकांत शिंदे आणि वाचक वर्गाचा अत्यंत आभारी आहे.

एकूणच मला लेखनास प्रवृत्त करण्याचे कार्य माझी पत्नी प्रा. सौ. कांचन करीत राहिल्याने हे शक्य झाले. माझे चिरंजीव डॉ. सुबोध व प्रबोध हे माझ्या लेखनास वेळ देता यावा म्हणून प्रयत्नशील राहिलेत. माझ्या उत्तम प्रकृती स्वास्थ्याचे संपूर्ण श्रेय माझी सून सौ. प्रांजली हिला जाते. या सर्वांच्या सहकार्याने तसेच डॉ. एस. के. पाटील ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, जयसिंगपूर आणि ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, संभाजीपूर येथील असंख्य मित्र व हितचिंतक स्नेहींच्या सहकार्याच्या सदभावना माझ्या पाठीशी सदैव असतात; या सर्वांचा मी ऋणी आहे. साहित्यकृतीचे पुस्तक होण्यास ज्या ज्या व्यक्तींनी प्रत्यक्ष - परोक्ष मदत केली त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

**- प्रा. प्रवीण वैद्य**

# वाचकाला समजेल असा सर्वोत्तम रंजक कथासंग्रह:
# उद्‌बोधन

माझे साहित्यिक मित्र श्री. प्रविणकुमार हेमचंद्र वैद्य हे व मी श्री. बाहुबली विद्यापीठात दीड तपाहून अधिक काळ एकत्रितपणे अध्यापनाचे काम करीत होतो. शाळेतील अनेक सांस्कृतिक कार्यक्रमातून व मराठीच्या अध्यापनातून त्यांच्यातला वक्ता प्रकर्षाने दिसून येत असे. लाघवी बोलणे स्पष्ट शब्दोच्चार, मुद्देसूद बोलणे यामुळे त्यांचे बोलणे नेहमीच विद्यार्थ्यांची व श्रोत्यांची मने काबीज करीत असत. श्री. बाहुबली विद्यीपीठाचे माजी संचालक आदरणीय भिसीकर गुरुजींनी श्री. प्रविणकुमारांच्या मधला लेखक हेरला होता म्हणूनच ‘सन्मती’ मासिकात श्री. प्रविणकुमार यांना त्यांनी सहसंपादक केले.

प्रविणकुमारांचे वडील श्री. हेमचंद्र वैद्य हेही एक कसलेले कथाकार व लेखक होते. सलग ३५ वर्षे त्यांनी सन्मती मासिकात कसदार लेखन केले. विशेषतः ‘दृष्टान्त कथामाला’ या शीर्षकाखाली त्यांचे प्रसिद्ध होणारे लिखाण एवढे वाचकप्रिय झाले की, बरेच वाचक आम्ही या सदरासाठीच सन्मतीचे वर्गणीदार झालोय असे बोलत. तर असा वसा व वारसा असणा-या श्री. प्रविणकुमार यांचा **उद्‌बोधन** कथासंग्रह प्रसिद्ध होत आहे या वार्तेने मला वैयक्तिक खूप आनंद झाला कारण त्यांच्या साहित्यिक कला गुणांचा लाभ मी संभाजीपूर व जयसिंगपूर या दोन्ही ज्येष्ठ नागरिक संघातील सदस्यांना या ना त्या रूपाने देत आलो आहे. ज्या ज्या वेळी आम्ही श्री. प्रविणकुमार वैद्य यांना कथाकथन, सूत्रसंचालन, अध्यक्षीय भाषण, पाहुण्यांची ओळख इत्यादी करण्यास विचारणा केली त्या त्या प्रत्येक वेळी ती विनंती त्यांनी तात्काळ मान्य करून आपल्या सुमधुर वाणीचा लाभ उपस्थितांना दिला आहे.

तर अशा साहित्यिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचे श्री. प्रविणकुमार वैद्य एके दिवशी माझ्याकडे आले आणि **उद्‌बोधन** हा कथासंग्रह प्रसिद्ध करत असल्याचे शुभवर्तमान सांगितले. प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील यांनी त्यास दुजोरा दिला व विनंती केली की, या कथासंग्रहाबाबत मी माझे हृद्‌गत लिहावे. अर्थात मी त्यास आंनदाने होकार दिला. कारण अलीकडील एक दोन वर्षात आम्ही तिघेही ब-याच वेळा एका व्यासपीठावर कांही कार्यक्रम पार पाडले आहेत.

जयसिंगपूर परिसरात डॉ. सुनील दादा पाटील यांनी साहित्यिकांची एक मांदियाळी उभी केली आहे. ८९ वर्षाच्या अशोक दादा पाटील यांचे पासून ते शिरढोण येथील इयत्ता १० वीत शिकणारी कु. आरती राजेंद्र खोत हिच्या काव्यसंग्रहापर्यंत मराठी - हिंदी - इंग्रजी आणि कन्नड भाषेतून शेकडो पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत. प्रथितयश साहित्यिकांची बरोबरी गाठण्यास अजून थोडावेळ लागेल कदाचित पण ती वाट आत्मविश्वासाने चालण्यास डॉ. सुनील दादा पाटील आणि ‘कंपनी’ यांनी सुरुवात केली आहे हे नि:संशय...

**उद्‌बोधन** या कथासंग्रहात सतरा कसदार कथा आहेत. प्रत्येक कथा उत्कृष्ट असून उत्तम कथाबीज असणारी आहे.

श्रद्धेचं महत्व भक्तांकडून पटवून देण्यात श्रद्धा या कथेत लेखकाचे कसब दिसते तर प्रत्यक्ष परमेश्वरालाही ‘स्मरणशक्तीचं’ ब्रेन टॉनिक घेणेस प्रवृत्त करणारा लाकुडतोड्या श्रोत्यांची चांगलीच करमणूक करून जातो. सन्यास कसा, केव्हा व कोणी घ्यावा याचे अभ्यासपूर्ण पण रोचक विश्लेषण ‘सन्यास’ या कथेत आहे. सर्वसाधारण वाचक श्रावक यांचेपासून ते सन्यासदीक्षा घेण्याच्या मन:स्थितीत आलेले श्रावक ते थेट दीक्षागुरुयांचेपर्यंत सर्वांनाच अंतर्मुख करणारी ही एक सुंदर कथा आहे.

दोन विद्वान वक्ते एकमेकांचा कसा द्वेष करतात हे ‘विद्वानद्वय’ या कथेत तर स्वप्न या मिश्कील कथेत पतिराजासमोर त्याच्या स्वतःच्या मरणाचा प्रस्ताव ठेवणारी पत्नीची मैत्रीण कसा यक्ष प्रश्न उभा करते हे कथा वाचूनच समजून घ्यावे हे बरे.

औचित्याचा अतिरेक या कथेत घराला आग लागल्यानं म्हातारी भाजते. तिला दवाखान्यात नेण्यासाठी घोड्याने एवढे हेलपाटे मारले की, त्यात तो मरतो. घोड्याची हाडं घश्यात आडकून टिपू कुत्रा मेला हे उलट्या क्रमाने नोकराने सांगितले आणि हे ऐकून शेवटी मालकही गतप्राण होतो. हे गंभीर कथाबीज फारच बहारदारपणे लेखकाने फुलवलं आहे.

उर्वरित कथांमधून असंच उत्कंठावर्धक कथाबीज घेऊन लेखकाने हा कथासंग्रह आकर्षक व उद्‌बोधनपर केला आहे.

‘कलेसाठी कला की जीवनासाठी कला’ हा ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांच्यामधील वाद ‘फडके-खांडेकर’यांच्या काळात गाजला होता. त्यातील ‘जीवनासाठी कला’ ही बाजू प्रस्तुत लेखकाने सप्रमाण सिद्ध केली आहे. प्रत्येक कथा रोचक तर आहेच पण प्रत्येक कथेतून एक महत्वपूर्ण ‘उद् बोधन’ लेखकाने अत्यंत बहारदार शैलीत केले आहे. भविष्यकाळात ‘उद् बोधन’ हा कथासंग्रह साहित्याच्या प्रांगणात निश्चितपणे चमकत राहील याबद्दल खात्री आहे.

लेखक श्री. प्रविणकुमार वैद्य आणि प्रकाशक डॉ. सुनील दादा पाटील यांच्या हातून भविष्यातही अशीच साहित्य सेवा घडत राहो अशी शुभेच्छा!

- **बी. बी. गुरव** (ज्येष्ठ समीक्षक)
माजी प्राचार्य - जनतारा हायस्कूल व जुनियर कॉलेज
संपर्क: 8421527496, 9421287107

# अनुक्रमणिका

१. श्रद्धा
२. ब्रेन टॉनिक
३. सन्यास
४. विद्वानद्वय
५. स्वप्न
६. औचित्याचा अतिरेक
७. अचूक उपाय
८. अध्यात्मपंडित
९. गतजन्माचे पाप
१०. परमसुख
११. पराभूत
१२. शब्दार्थ
१३. दु:ख हरता, सुख करता माझा मीच
१४. सुमती
१५. अभिरुची
१६. परिचय
१७. सव्वाशेर

# १. श्रद्धा

चातुर्मास सुरू झाला की घराघरातून - मंदिरा मंदिरातून धार्मिक प्रवृत्तीची माणसे व्रतवैकल्ये, शास्त्रपुराण यात मग्न होतात. कांही ठिकाणी सप्ताह साजरे केले जातात. त्यासाठी बाहेर गावचा एखादा नावाजलेला कीर्तनकार बोलावण्यात येतो. यावर्षी देखील श्रीरामपूरचे प्रसिद्ध कीर्तनकार राघवेंद्र बुवांना पाचारण करण्यात आले. त्यांचा व्यासंग दांडगा, आवाज जेवढा मधुर तेवढाच भरदार, साथीला त्यांचीच माणसे, त्यामुळे कीर्तनात खूपच रंग भरे. रात्री आठला सुरु झालेले कीर्तन बाराला संपे.

त्यांच्या कीर्तनात जी गाणी म्हटली जात त्यांच्या चाली म्हणजे शास्त्रीय गायनाची मेजवानीच. कीर्तनातील एखाद्या गंभीर प्रसंगाने लोकांच्या मनावर कमालीचा ताण येतो आहे असे दिसताच एखादा हास्यप्रधान चुटका अशा काही शैलीने व आविर्भावाने ते वर्णन करीत की श्रोत्यांची हसता हसता पुरेवाट होई.

कथानके प्रत्येक दिवशी निराळी असत. कधी रामकथा तर कधी कृष्णकथा, कधी छ. शिवाजींचा अफझलखान वध, कथा पौराणिक असो, ऐतिहासिक असो की नेताजी सुभाषचंद्र सारख्या राष्ट्रपुरुषाची असो, श्रोते तल्लीन होत व चार तास तरी खिळून बसत.

असा हा सप्ताह आनंदात पार पडला, बुवा उद्या प्रस्थान करणार होते, ब-याच श्रोत्यांनी बोवांसाठी भेटवस्तू दिल्या. कपडे, भांडी, पैसे दिले, बुवानीही कृतज्ञतापूर्वक सर्वांचे आभार मानले आणि शेवटच्या कथेला सुरुवात केली.

आजचा विषय होता 'परमेश्वरावर अपार श्रद्धा' ती ज्यांच्याजवळ होती त्यांचे साक्षात परमेश्वराने अनेक संकटातून कसे संरक्षण केले हे त्यांनी भक्त प्रल्हाद, सावित्री, ध्रुव, द्रौपदी, राजा हरीश्चंद्र वगैरेंच्या उदाहरणावरून समजावून दिले. श्रोते तृप्त झाले, सर्वांनी परमेश्वर भक्ती आणि श्रद्धा प्रगाढ करण्याचा निश्चय केला व कृतार्थतेने आपापल्या घरी परतले. बुवांच्या ज्ञानाची, श्रद्धेची वर्णने यांची आपआपसात चर्चा होऊ लागली.

बुवा उद्या प्रस्थान करणार हे माहित होताच शेजारच्या एका लहानशा गावची मंडळी त्यांना भेटायला आली. त्यांचे मागणे एवढेच की 'येथून जवळच आमचे गाव आहे भोवताली बरीच खेडी आहेत, एक कीर्तन तेथे होऊ द्या. भरपूर मानधन मिळेल. ही आलेली संधी साधून चार पैसे पदरी बांधावे म्हणून बुवांनी होकार दिला.

त्या गावात प्रवेश करण्यापूर्वी एक ओढा ओलांडावा लागे. त्या गावचे लोक निमंत्रण देऊन रात्रीच आपल्या गावी परतले. व दुस-या दिवशी बुवांची वाट पाहू लागले.

चातुर्मास म्हणजे पावसाळाच. पाऊस केंव्हा किती पडेल नेम नाही. बुवा आपल्या साथीदारांसह ओढ्याकाठी आले. पेटी, तबला आणि वादक पैलतीरावर सुरक्षित पोहोचल्याचे पाहिले. ओढयाचे पाणी चढतच होते.

आता अलिकडच्या तीरावर फक्त बुवाच राहिले. त्यांनी ओढ्यात पाय टाकला पाणी गुडघ्यापर्यंत चढले होते. त्यांनी चटकन माघार घेतली. कांही क्षणात पुन्हा पाणी वाढले ते कमरेपर्यंत. बुवांनी माघार घेतली हेच बरे झाले म्हणून स्वतःला आपल्या शहाणपणाबद्दल शाबासकी दिली व तीरावरच बसले. किंचित पातळी कमी झालेली दिसली की ते पुन्हा पाण्यात पाय ठेवत व भीतीने माघार घेत.

असा प्रकार चालू असतानाच तेथे एक खेडूत येऊन पोहोचला, त्याने आधल्या रात्री बुवांचे कीर्तन ऐकले होते. पण तेच बुवा. हे तो ओळखू शकला नव्हता. तो खेडूत त्या बुवाला साधा माणूस समजला व म्हणाला,

‘अरे दुर्दैवी माणसा, तू जर बुवांचं कालचं कीर्तन ऐकलं असतस तर अशी जीवाची घालमेल करीत बसला नसतास’, ‘हे पहा भित्र्या माणसा, अरे परमेश्वराचे नामस्मरण करीत कसल्याही डोहात बुडी मारली तरी ‘तो’

तारतो - श्रध्दा मात्र पक्की हवी. भ. रामचंद्रांचे नाव हनुमान व त्याच्या वानरसेनेनं राम ही दोन अक्षरं दगडावर लिहून पाण्यात टाकताच ती तरंगू लागली. हा कशाचा प्रताप? केवळ श्रध्देचा, आणि तुम्ही वारंवार पाण्यात पाय ठेवून माघारी फिरलात! याचे कारण तुमची ईश्वरावर श्रध्दाच नाही. आज त्याच बुवांचं पलिकडच्या गावात कीर्तन आहे ते ऐका म्हणजे डोक्यात प्रकाश पडेल. हा पाहा मी तिकडेच निघालो ‘प्रभू रामचंद्र की जय’ एवढे म्हणून तो त्या चढत्या पुरातून भराभर पावले टाकीत पैलतिरी पोहोचला. त्यानं मागं वळूनदेखील पाहिले नाही.

बुवा मात्र त्या दिशेकडे विस्मयाने, थोडे ओशाळून पाहत राहीले. तोपर्यंत गावकरी बुवांना घेण्यासाठी येऊन पोहोचले.

बुवांचे कीर्तन आज नेहमीसारखे रंगले नाही. तो खेडूत, त्याचा उपदेश, त्याची निर्भत्सना व स्वतःची अश्रध्दा अंतरमनात नाचत होती.

- पूर्वप्रसिद्धी मासिक **सन्मति**



# २. ब्रेन टॉनिक

जुन्या पिढीच्या लोकांना ऐकून माहित असेल ही 'लाकूडतोड्याची गोष्ट' मात्र कदाचित नवीन पिढीच्या मुलांना ती माहित नसेल, ती अशी होती. एक अत्यंत गरीब असा लाकुडतोड्या नदीकाठचे एक झाड तोडीत असताना त्याच्या हातातील कु-हाड निसटली व नदीत बुडाली. त्याला पोहायला येत नव्हते म्हणून कोणतीही रिस्क घेण्यास त्याचे मन धजत नव्हते. घराची गरिबी, तापट बायको आणि अमाप पोरं. हे सर्व त्याच्या डोळ्यासमोर दिसू लागले. आता काय होणार या कल्पनेनेच त्याला रडू कोसळू लागले.

बराच वेळ त्या निर्जन जंगलात अश्रुपात करीत बसला. देवाला त्याची अवस्था पाहून दया आली व तो लाकुडतोड्यासमोर प्रगट झाला. त्यांच्यातील संवाद असा - ‘कां रडतोस रे!’

देवा माझी कु-हाड या नदीत पडली. आता माझ्या उपजीविकेचं साधनच नाहीसं झालं रिकाम्या हातानं घरी गेलो तर बायको अंगावर ओरडेल, मुलं रडून गोंधळ करतील तेव्हा  आपण माझ्यावर दया करा व माझी कु-हाड तेवढी काढून द्या! देवाला त्याची दया आली खरी, पण त्याच्या प्रामाणिकपणाची परीक्षा पहावी असा विचार करून देवाने पाण्यात बुडी मारली व एक कु-हाड काढून त्याला विचारले, ‘काय रे हीच आहे ना तुझी कु-हाड?’

'नाही देवा, ही तर सोन्याची आहे; ही माझी नव्हे'.

देवाने पुन्हा बुडी मारली व दुसरी कु-हाड दाखवून विचारले, 'हं, हीच न तुझी?'

'नाही, नाही ही तर चांदीची आहे ही माझी नव्हे'

देवाने तिस-यांदा बुडी मारली व तिसरी कु-हाड त्याला दाखवताच तो ओरडला, ही लोखंडाचीच माझी आहे.

सोन्या-चांदीच्या कु-हाडीचा यत्किंचितही मोह त्याला झाला नाही, त्याने त्या नाकारल्या हे पाहून देवास आनंद झाला, घरात एवढे दारिद्रय असुनही एवढा प्रामाणिकपणा एका सामान्य लाकुडतोड्याने दाखवावा याचे कौतुक वाटले व देवाने त्यास तीनही कु-हाडी बक्षिसादाखल देवून अदृश्य झाला. अशी ही गोष्ट होती. यानंतर अगदी अलीकडचीच गोष्ट - तोच लाकुडतोड्या त्याच नदीकाठी पुन्हा एकदा अगदी छाती बडवून आक्रोश करू लागला असे दोन दिवस गेले.

त्याचा हंबरडा ऐकून देव विचारात पडला. हा तर तोच प्रामाणिक लाकुडतोड्या दिसतो आहे. कदाचित पुन्हा संकटात असेल, पण प्रत्येकवेळी आपण त्याची कशी मदत करणार? तेवढ्यात लाकुडतोड्या म्हणू लागला, ‘देवा, गेल्या दोन दिवसापासून मी तुमचा धावा करीत आहे. त्या निर्जीव कु-हाडीसाठी धावून आलात पण आता तर माझ्या संसाराचा प्रश्न आहे, तुम्ही मदत करीत नसाल तर मी या नदीत जीव देईन.’ देव पेचात पडला, प्रगट होऊन त्याला विचारता झाला, ‘काय रे काय भानगड आहे?’

‘देवा, परवा माझी बायको धुणं धुवायला म्हणून इथं आली होती ती परतलीच नाही, माझ्या संसाराचा विचका झाला. आत्ता तर माझा सर्वनाश ओढवला आहे. देवाने नदीतून एक स्त्री बाहेर काढली. तिचे अप्सारेसारखे सुंदर रूप पाहून सिनेनटीचे स्मरण झाले. पण नावं आठवत नव्हते. तिच्याकडे पाहून तो देहभान विसरला. देव विचारात पडला, त्या लाकूडतोड्याची ती समाधी भंग करीत विचारले, 'काय रे बोलत का नाहीस? हीच न तुझी बायको? '

'नाही देवा', तो अडखळत म्हणाला.

देवाने दुसरी बुडी मारून दुसरी रुपसुंदरी बाहेर काढली, 'काय रे ही तरी तुझी आहे काय?'

ह्यावेळी सुद्धा तो आवक होऊन तिच्याकडे पहातच राहिला.

'बोल ना लवकर, हीच न तुझी बायको?'

'नाही देवा'

'मग नाही म्हणायला किती कष्ट पडताहेत रे तुला?'

'तसं नाही देवा, पण ह्या दोघींना कुठेतरी पाहिल्यासारखं वाटलं ते आठवायचा प्रयत्न करीत होतो.'
'ठीक आहे.'

देवाने तिसरी बुडी मारली व तिसरी स्त्री बाहेर काढली.

'ही तरी तुझीच बायको आहे नां?'

बराच वेळ गेल्यावरही कष्टी होऊन उभा राहिला.

'अरे असा मख्खपणे आता इथं उभा का? घेऊन जा तिला घरी.'

एक किलोमीटर चालून गेल्यावर देव अजून अंतरधान पावला नाही हे त्याच्या लक्षात आले, बायकोला तेथेच उभे करून तो परत देवाकडे आला.

'हं, आता काय राहिलं आणखी? का आलास परत?'

'नाही, म्हटलं देवा, आपली प्रकृती ठीक आहे ना?'

'म्हणजे तुला काही बरं वाईट दिसल की काय?'

'तसं नाही देवा, पण आम्हा मानवाचं की नाही सगळंच बदललं अलीकडे.'

'ते कसं काय?'

म्हणजे असं की, भयानक महागाई, अन्नधान्याची टंचाई, देशाची अधोगती ह्याचा परिणाम आमच्या मेंदूवर होऊन स्मरणशक्ती पार वितळून गेली. आणि असं काही झालं कि आम्ही डॉक्टरकडे जातो आणि ब्रेनटॉनिक घेतो, बरे वाटते त्यामुळे.

'ते खरं रे, पण मला हा उपदेश कशासाठी?'

देवा, वाईट वाटून घेऊ नका. पण आपली स्मरणशक्ती ही कमी झाल्यासारखे वाटले म्हणून म्हणालो - 'मी ही विसरलो?'

गेल्यावेळी माझी कु-हाड नदीत पडली. तुम्ही प्रथम सोन्याची, नंतर चांदीची नंतर लोखंडाची काढली, पहिल्या दोन माझ्या नाहीत असे म्हणताच आपण दोनही कु-हाडी मला बक्षीस दिल्या.

'बर मग?'

'पण देवा, ह्यावेळी पहिल्या दोघी माझ्या नाहीत असेच म्हणालो, तरी ह्यावेळी मात्र केवळ माझी बायको मला दिली.'

'असं म्हणतोस होय?'

'होय देवा, काही चुकलं का माझं?'

'छेः छेः तुझं काहीच चुकलं नाही, माझच चुकलं.'
यापुढे तुझ्या डॉक्टराचं ब्रेनटॉनिक सुरु करणे आवश्यकच आहे. कारण झाली ती चूक पुन्हा होता कामा नये.

किती हा बदल! असे म्हणत देव अदृश्य झाला. ते पुन्हा प्रगट न होण्याच्या निश्चयानेच.

- पूर्वप्रसिद्धी मासिक **सन्मती जानेवारी २००४**

# ३. संन्यास

प्रापंचिक माणसाला जेव्हा काही कारणाने वैताग येतो तेव्हा तो त्याचा अर्थ जाणून विरागी होतो. या वैराग्याला अनेक प्रसंग कारणे निमित्त ठरू शकतात. जसे - स्मशान वैराग्य.

जेव्हा एखाद्या परिचित माणसाच्या प्रेतयात्रेत आपण सामील होतो, तेव्हा सहजच असे भाव होतात की, एक दिवस आपणालाही येथे यावेच लागणार! आता पुढील आयुष्य रागद्वेशाचे माहेर असलेला प्रपंच सोडून संन्यास घेऊन जंगलात निघून गेलेले बरे!

तेथे एकांतात तत्वाध्ययन चिंतन मनन निवांतपणे करता येईल. पण भावनावेग अनावर झाला की माणूस गुरूदेवचरणी धाव घेतो व विनवतो की आता मला संसाराचा वीट आला आहे. मला दीक्षा द्या.

गुरूमहाराज विचार करतात की, असा सुविचार लाखात एखाद्याच्याच मनात यायचा, माणूस तसा बरा दिसतो, उगाच कालापव्यय निदान अशा प्रसंगी तरी नको म्हणून दीक्षेचा दिवस निश्चित होतो व संन्यास दीक्षा समारंभपूर्वकसंपन्न होतो. सगळीकडे आनंद, आल्हाद व प्रसन्नता दरवळते. नूतन संन्यस्त स्वतःला कृतार्थ समजतो.

काही दिवस, महिने जातात आणि त्या संन्यासवृत्तीची कठीणता त्याला जाणवू लागते. गृहस्थावस्थेत भोगलेले विषय वैभव स्मृतिरूपाने त्रस्त करू लागते.

भूक, तहान, अपूरे कपडे, आप्तेष्टांचा वियोग जाणवू लागतो. अध्ययन, ध्यान, चिंतन यात लक्ष केंद्रित होईनासे होते, अपूर्ण ज्ञानाभ्यासामुळे प्रवचन प्रभावी ठरत नाही म्हणून श्रोते आदराने पाहू शकत नाही. ह्या सर्वांचा मानसिक ताण फुटलेल्या धरणाप्रमाणे किंवा जागृत ज्वालामुखीप्रमाणे रागद्वेषरूप होऊन उसळी मारून बाहेर पडू लागतो.

कुणाला धनैषणा, कुणाला लोकैषणा, कुणाला आणखी कसली तरी एषणा वर्षाॠतूतील मेघाप्रमाणे इतकी दाटून येते की क्रोध कटू शब्द या रूपाने केव्हा त्याची मुसळधार वर्षा होईल हे सांगता येत नाही.

हा सगळा परिणाम पूर्वतयारी शिवाय घेतलेल्या संन्यासवृत्तीचा. पहा कसे!

एकदा एका संसारी पण लहरी माणसाने रागाच्या भरात आपल्या पत्नीला विहीरीत ढकलून दिले आणि सरळ त्यागींकडे जावून ठिय्या मारून बसला, गुरूदेवा मला दीक्षा द्या!

बराच काळ निघून गेला पण हा गृहस्थ आपली जागा सोडण्यास तयार नव्हता, गुरूदेव म्हणाले एवढी घाई कसली? प्रथम धर्माभ्यास, आचरणाची दृढता, सर्वस्वाचा त्याग या गोष्टी आवश्यक आहेत. त्या गृहस्थाने ताबडतोब सर्व वस्त्रांचा त्याग केला व निश्चल उभा राहिला.

त्याची तडफ, त्यागाची तयारी पाहून गुरूदेवांनी संन्यास दीक्षा देण्याचे ठरवले. लवकरच समारंभपूर्वक दीक्षा होऊन 'प्रशांतसागरजी महाराज' त्या परिसरात वावरू लागले.

काही माणसे अशी एककल्ली, लहरी, विक्षिप्त असतात, शीघ्रकोपी असतात की थोड्याशा विचलीत अवस्थेत काहीही करून मोकळे होतात. त्यांच्या जिद्दी, दुराग्रही स्वभावात मात्र बदल होत नाही, इतर त्यागी जर सहा तास ध्यान करत तर हे दहा तास करीत असत. प्रत्येक गोष्टीत आपण सरस असल्याचे भासवत असत. झाले, ते सामान्य श्रावकांच्या श्रध्देचे उच्च स्थान पटकावून प्रसिध्दीच्या शिखरावर विराजमान झाले, भक्तांची गर्दी, होऊ लागली.

एकदा ही वार्ता त्यांच्या बालमित्राच्या कानावर गेली, आपला मित्र जो अत्यंत रागिष्ट पण आज एक प्रसिध्द 'प्रशांतसागर महाराज' म्हणून ओळखला जातो. एकदा दर्शन तर घेऊन यावे.

संध्याकाळची वेळ, महाराज भक्तांना काही सांगत होते तोच हे मित्र पोहोचले, नमस्कार केला एकाच गावात राहणारे, एकाच शाळेत शिकलेले पण आज अपरिचित होते, ओळखून न ओळखल्याचा भाव मुद्रेवर होता, खरेच आहे, असा एखादा उच्चपदस्थ मित्र आपल्या मित्राला पूर्वओळख दाखवायला तयार नसतो, त्यात कमीपणा वाटत असतो. संधी मिळताच मित्राने महाराजांना आपले नांव काय?असे विचारले.

'माझे नांव प्रशांतसागरजी, कां तुम्ही पेपर वाचत नाही का?'

'माफ करा,' असे म्हणून काही वेळ इकडतिकडच्या गप्पा झाल्या, परत मित्राने तोच प्रश्न केला.

'महाराज आपले नाव काय?'

महाराजांनी आपल्याजवळची पिंच्छी लगेच उचलून मित्राला फेकून मारली, म्हणाले डोके फिरले की काय?

माझे नांव 'प्रशांतसागर आहे, चल पळ माझ्यासमोरून ! मित्र बाहेर पडत म्हणाला, 'नावात प्रशांतसागर पण आचरणात बदल मात्र नाही.'

स्वभाव कसा बदलला? हेच तर मला पहायचे होते.

सन्यास घेण्यास पूर्वतयारी कसली असते?

इंद्रियदमनाचा क्रमवर्ती अभ्यास वर्षानुवर्षे करावयाचा, तत्वज्ञानाचा प्रगाढ व्यासंग करूनच इंद्रियविजय शक्य होतो, म्हणून अहर्निश तत्वाभ्यास करण्यासाठी उमेदीची, बालपणाची काही वर्षे सद्गुरूसन्निध घालविणे आवश्यक, प्रौढपणी बुध्दी वळत नाही व बालपणाइतके परिश्रमही होत नाहीत म्हणून बालपणापासूनच धर्माभ्यास झालेला असणे बरे! बालपणाचे, धर्माध्ययन, सद्गुरूसानिध्य व इंद्रियदमनाचा

प्रयत्न ज्यांच्या वाट्यास आलेला नाही, त्यांना ते प्रौढपणी जमेलच अशी खात्री देता येत नाही. परिणाम असा होतो की रागद्वेष खवळून उठतात, संन्यासवृत्तीचे हसे होते, उपहासाचा विषय होतो, खरे तर संन्यासात ज्ञानाच्या उच्चतेपेक्षा रागद्वेषाची मंदता अधिक अपेक्षित असते. ती प्रयत्नानेच साधली जाते. नाहीतर जसा घरप्रपंच तसा सन्यास झाला.

काही स्वभावजन्य दोष सन्यास पत्करल्यानंतर अशोभनीय ठरतात, त्या संन्याशापेक्षा संन्यासधर्माचीच निंदा निर्भत्सना होऊ लागते. सामान्य लोक धर्मापासून दूर जाऊ लागतात. हा हास्यविनोदाचा विषय बनतो. ह्यापेक्षा सन्यास न घेतलेला बरा नव्हे काय?

गृहस्थावस्थेत राहून सन्यासधर्माची व्रते पाळावीत, रागद्वेषाची मंदता साधावी हे उत्कृष्ट आणि प्रशंसनीय पण सन्यास घेऊन गृहस्थांना देखील लाजविणारे थेर करणे हे निकृष्ट व निंद्यच म्हणावे.

**रागद्वेषाने भरलाशी, कशाला झाला संन्याशी ।**
**सोडूनि गेला घरादारा, सोबत नेला सारा पसारा ।।**



# ४. विद्वानद्वय

अलिकडे बहुतेक शहरातून ग्रामीण भागातूनही व्याख्यानमाला सप्ताह साजरा करण्यात येतो. गावोगावचे विद्वान विविध विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान देताना दिसतात. हा उपक्रम गावप्रमुख मोठ्या मेहनतीने समाजकार्य म्हणून उत्साहाने करीत असतात.

एकदा काय झाले पहिल्या दिवसाचा वक्ता यायला वेळ झाला. व्याख्यानाची वेळ निघून गेली. त्याचा दिवस वाया गेला. मानधन तर द्यावेच लागणार म्हणून त्यांचे व्याख्यान दुसरे दिवशी ठरले. तोपर्यंत दुसऱ्या दिवशीचा वक्ताही येऊन दाखल झाला. आता एकाच दिवशी दोघांची भाषणे ठेवणे भागच होते. तेव्हा प्रत्येकाने एकएक तास व्याख्यान द्यावे असे ठरले. दोन्ही वक्ते अतिशय विद्वान होते. पण यापूर्वी दोन्ही विद्वानांचे परस्पर खटके उडाले होते, त्याचा राग अजून गेला नव्हता.

त्यापैकी एक महाशय प्रातर्विधीला गेले असताना दुसऱ्या महाशयांना त्यांच्याबद्दल माहिती विचारली ते तुसडेपणाने म्हणाले हा ना ! अगदीच गाढव आहे. अशा ढोंगी माणसाला उगाच महत्त्व देऊन बोलावलं कसं याचच आश्चर्य वाटतं मला! त्यांची ही मुक्ताफळे ऐकून यजमान गप्प बसले. खरे तर त्यांचा परिचय करून देण्यासाठी चौकशी करीत होते. पण इथे त्यांचा परिचय ऐकून गप्प बसावे लागले.

थोड्या वेळानंतर हे वक्ते प्रातर्विधीत गुंतले असताना दुसऱ्या वक्त्यांना पहिल्या वक्त्याबद्दल विचारले. त्यावर ते रागानं म्हणाले, 'हा नुसता घाण्याचा बैल आहे. उगाच विद्वत्तेचा टेंभा मिरवीत असतो. ह्याला बोलावलं 'कसं' ह्याचं आश्चर्यच वाटलं मला.'

हे वर्णन ऐकताच संयोजक पुन्हा दचकले. हा असा परस्पर परिचय जाहीर सभेत काही उपयोगी ठरणार नाही. म्हणून ते गप्प बसले. त्यांच्या चिंतेची जागा आता त्यांच्या विनोद बुध्दीने घेतली.

मध्ये जेवणाची वेळ झाली. गावातली चार प्रतिष्ठित मंडळी भोजनाला बोलावली होती. दरवर्षाप्रमाणे ताट-पाट-रांगोळ्या-उदबत्ती वगैरे सर्व काही यथासांग झाले.

सर्वांची ताटे वाढली गेली. पण एका ताटात सुंदरसे हिरवे गवत व दुसऱ्या ताटात थोडासा केरकरचरा, कागदाचे तुकडे वाढण्यात आले. कोणी कोठे बसावे ह्याचा धोरणीपणाने संकेत करण्यास यजमान चुकले नाही.

वैश्वदेव चित्रावती झाल्या-आचमन झाले. पण ते दोघे वक्ते परस्पराकडे चमत्कारिक नजरेने पाहू लागले नंतर दोघांनीही यजमानाकडे पाहताच यजमान उत्तरले, 'आपण परस्परांचा जो मघाशी परिचय करून दिला ना, त्यावर हुकुम आपल्या आवडीचे पदार्थ आपणासाठी मुद्दाम आणवले आहेत. त्याबद्दलचा अधिक खुलासा आपण परस्परात करून घ्यावा.

ते दोघेही शरमले, वरमले, समजले. यजमानांनी तातडीने दुसरी ताटे आणवून सर्व काही सावरून घेतले, क्षमायाचनापूर्वक दोघांनाही आग्रहाने वाढून खुश केले खरे - पण त्या विद्वानांना त्या प्रसंगातून बरेच काही शिकता आले.

वस्तुतः विद्या ही विनयाने शोभते, ज्या विद्वानाला विद्वत्तेसोबत विनयसंपन्नता प्राप्त झाली नाही ती विद्वत्ता फळास आली नाही - व्यर्थ गेली असेच समजायला हवे.

मतभेद, पंथभेद, पक्षभेद, जातिभेद, वृत्तीभेद, वर्णभेद ह्यांचे अस्तित्व कधी संपायचेच नाहीत. ते सांभाळूनही विद्यासंपन्नांनी क्षमाशील व परस्पर सहिष्णू बनण्यास शिकले पाहिजे.

- पूर्वप्रसिद्धी मासिक **सन्मति २००४**

# ५. स्वप्न

आज सकाळी उठल्यापासूनच 'ती' अत्यंत उदास व खिन्न अवस्थेत होती. दैनंदिन चर्चेचे देखील तिला भान नव्हते. पतिराजांना मोठा प्रश्न पडला की आज हिला झाले आहे तरी काय? विचारले तर मौन, बोलणं बंद, काही खात नाही की पीत नाही. सर्व जिथल्या तिथे, मुखमार्जन नाही, स्नान नाही, पूजाअर्चा नाही की चहापाणी नाही बरं नाही घेत काही तर ठिक आहे, हकरत नाही पण नवरा आहे, मुलंबाळं आहेत त्यांना तरी रोजच्या सारखे कांही करायला नको का?

काही दुखते-खुबते कां? औषध घेतले का? डॉक्टरांकडे जायचे कां? सर्व काही विचारून झाले. त्यावर तिचे उत्तर, 'मला कसली धाड झाली आहे, चांगली ठणठणीत तर दिसते ना तुम्हाला? कशाला काळजी दाखवता उगीच!'

आता काय करावे की तिची कळी खुलेल? खूप प्रयत्न झाला. पण व्यर्थच, शेवटी पतिराज नित्याप्रमाणे आपल्या नोकरीच्या ठिकाणी हजर झाले, बाहेरच नाष्टा उरकला. शाळेत जाणाऱ्या मुला-बाळांना कसे पाठवले ह्या विचारातच कामकाज आवरले, निदान संध्याकाळपर्यंत तरी मूड येईल, स्वयंपाकपाणी करील आणि घालील सर्वांना जेवायला.'

पण कसचे काय नि कसचे काय !

संध्याकाळ झाली, आशेने घर जवळ केले. पाहतो तो सकाळचेच वातावरण, कशीबशी रात्र उलटली तरी तिचे मौन कायमच.

आता हीचा हा अवतार कधी बदलेल, मूड केव्हा येईल आणि हे गणित सुटेल कधी ही विवंचना पतिराजांना लागून राहिली. त्यातून कसलाच मार्ग निघेना, शेवटी पतिराज तिच्या एका जिवभावाच्या मैत्रिणीकडे गेले, तिला कालपासूनचा इतिहास वर्णन करून सांगितला. थोडा वेळ विचार करून ती म्हणाली, 'तुम्ही चिंता करू नका. मी पाहते काय

करायचे ते, तुम्ही मला सांगा की काही तिच्या मनाविरूध्द घडले काय? त्याशिवाय ती असे करणार नाही. जरा धीर धरा. खरं सांगू, बायकांचा मूड सांभाळणं ही गोष्ट सामान्य बुध्दीच्या नवऱ्यांना सहसा जमत नसतेच, त्यालाही उच्च पातळीची बुध्दीमत्ता लागते. आणि ती सहसा पुरुषांमध्ये आढळतच नाही. त्यामुळे अनेकांचे संसार विस्कळीत होतात. सूर जुळत नाहीत.

हे तिच्या मैत्रिणीचे सर्व प्रवचन ऐकून, स्वतःच्या निर्बुध्दतेची निर्भत्सना करीत बिचारे पतिराज आल्यापावली हिरमुसले होऊन परतले, दुसरे करता काय?

तो दिवस गेला, दुसरा गेला, तिसरा दिवस उगवला, तिचे आपले तेच, तीच उदास चर्या, तोच हिरमुसलेपणा, निरूत्साह आणि तोच मूड.

चौथ्या दिवशी पुन्हा मोठ्या आशेने पतिराज तिच्या मैत्रिणीकडे गेले, चिडून, काकुळतीला येऊन म्हणाले, 'आता तरी सांगता का, काय बिघडले ते. काय चुकले आमचे! आम्ही जर चुकले असू तर ती चूक पुन्हा होणार नाही म्हणून कान धरू, क्षमायाचना करू.'

बऱ्याच वेळानंतर मोठ्या कष्टाने शेजारणीने सांगितले की 'जे आनंदेही रडते, दुःखात कसे ते होई' आठवतं ना?

'हो आठवतं. पण घरात अशा आनंदाची किंवा दुःखाची कसलीच घटना घडली नाही हो! आता अंत पाहू नका, सांगा लवकर म्हणजे जीव गहाण टाकून तिची इच्छा पूर्ण करू.'

'हो, पण तिचं परिमार्जन नको का व्हायला?'

'मान्य, पुढे बोला.'

'त्याचं असं झालं' आणि त्यानं जीवाचा कान केला.

'तिला म्हणजे तुमच्या लाडक्या सौभाग्यवतीला सकाळी-सकाळी एक स्वप्न पडलं, त्यात तुमचा देहान्त झाल्याचं तिनं पाहिलं.' 'अस्स, अस्स. मग तिला वाईट वाटणं स्वाभाविकच आहे की, हेच ते, हेच, तुम्ही नवरे मूर्ख म्हणतो आम्ही यासाठीच.

'बरं मग काय ?'

'अहो, आजपर्यंत तिचं एकही स्वप्न खोटं ठरलं नाही आणि उठल्याबरोबर पाहते तो तुम्ही अगदी ठणठणीत.'

'मग का बसू नये तिला धक्का? का होऊ नये उदास? खोटं ठरलेलं हे तिच्या आयुष्यातले पहिलेच स्वप्न, समजले नीट? मग करा लवकर यावर उपाय!'



# ६. औचित्याचा अतिरेक

त्यावेळी दळणवळणाची साधने नव्हती, टपाल, टेलिफोन नव्हते. कुठे यात्रेला जायचे झाले तर आपण घरी परत येऊच याची खात्री नसे. म्हणून सर्व आवराआवर करून, देण्या-घेण्याचे व्यवहार पूर्ण करून जावे लागे. ज्यांची ऐपत चांगली असे ते धनिक लोक मात्र एखादा विश्वासू नोकर माणूस घर सांभाळण्यास ठेवून जात. एका श्रीमंताने असाच एक इमानी नोकर घर-संपत्ती आणि पाळीव जनावरांची व्यवस्था व सांभाळ करण्यासाठी मागे ठेवला व ते तीर्थयात्रेला निघून गेले.

तीर्थयात्रा सकुशल पार पडली, एक वर्ष उलटून गेले हाते. श्रीमंतांना परतीच्या प्रवासात आपल्या घराची ओढ लागली. साधारणतः ३०-४० कि. मी. अंतरावर गाव येताच त्यांना आपल्या घरादारासंबंधीच्या माहितीची चुटपूट अस्वस्थ करू लागली. कशातच कांही लक्ष्य लागेना, बैलगाडीच्या प्रवासाने अधिकच शीण जाणवू लागला. स्वास्थ्यही बिघडले. एका धर्मशाळेत मुक्काम करून त्यांनी तेथूनच एक माणूस आपल्या गावी पाठविला. व आपल्या प्रामाणिक नोकराला बोलावून घेऊन ये, असा हुकूम सोडला. त्याप्रमाणे त्यांचा प्रामाणिक नोकर हजर झाला. त्याला पाहून श्रीमंतांना बरे वाटले. प्रवासाचा थकवा क्षणभर विसरले. मोठ्या आशेने व ममतेने ते विचारू लागले -

'काय रे, सर्व कुशल आहे ना?'

'होय मालक, सर्व काही सकुशल आहे.'

'अरे मग असा चिंतेत का?'

'काही नाही. उगच आपलं.'
'अरे, तो आपला 'टिपू' नाही आणला सोबत?'

'हां, तेच ते, तेच सांगायचं होतं मला !'

'काय सांगायचं होतं?'

'नाही म्हटलं, अगदी परवापर्यंत तर तो अगदीच छान होता.'

'बरं मग, परवा काय झालं?'

'एकाएकी गडबडा लोळायला लागला आणि त्यानं क्षणभरातच प्राण सोडला, जाणत्याला बोलावून विचारलं तर तो म्हणाला त्याच्या गळयात हाड अडकल्यानं तो गुदमरून मेला.'

'गळयात हाड अडकायला कुठं बाहेर गेला होता?'

'बाहेर कशाला जायला हवं, घरातच तर भरपूर हाडं सापडली त्याला.'

'घरात कुठली हाडं?'

'घोडा मेला नव्ह का?'

'घोड्याला मरायला काय झालं?'

'हेलपाट्यानं तो अशक्त झाला आणि मेला.'

'कुठले हेलपाटे?

'म्हातारीला दररोज शेजारच्या शहरात वैद्याकडे न्यायचं आणि परत आणायचं १० कि. मी. चे म्हातारीला घेवून चालणे असल्यावर तो कसा जगणार?'

'अरे पण म्हातारीच्या आजाराचं काय झालं?'

'पिकलं पान ते गळणारच, दुसरं काय व्हायचं?'

'अरे पण, असला आजार तरी कसला झाला तिला?'

‘सगळं अंग भाजलं तिचं, त्यामुळे रोज जखमा धुवायच्या व मलमपट्टी व्हायची.’

‘अरे पण म्हातारी भाजायला कुठं कुंभाराकडं गेली होती की काय?’

‘छेः छेः घरालाच आग लागल्यावर कुठं जायला कशाला पाहिजे?’

‘कुणाच्या घराला लागली आग?’

‘दुसऱ्या कुणाच्या, आपल्याच की!’

‘असं होय, मग सगळं काही कुशल आहे म्हणालास ते?’

‘हो, म्हणजे मी नाही का कुशल? आपण सुखी तर सारे जग सुखी, ह्या तत्वानं बोललो मी! शिवाय यात्रेहून आल्याबरोबर आनंदात विघ्न नको. म्हणून प्रथम सर्व काही कुशल आहे हे सांगणच औचित्याला धरून नाही कां? आपणच तर आम्हांला सांगून ठेवलं की औचित्यगुण नसेल तर सर्वच गुणांची माती होते.’

‘शाब्बास! औचित्य हा गुण खरा पण त्याचा असा अतिरेक जीव घेणाराच ठरायचा!’

‘माझ्या मते जीव वाचवणारा. पण हे काय? मालक तुम्ही बोलत का नाही? गेले वाटतं मालक!’

दैवगतीपुढे कोणाचे काही चालत नाही. तरी बरं, मी अगदी क्रमाक्रमानं पुढे गेलो, अगदी सावकाश एक एक पाऊल चाचपडत, सांभाळत.

अखेर जे व्हायचं ते झालंच.

- पूर्वप्रसिद्धी मासिक **सन्मति २००३**

# ७. अचूक उपाय

एक अत्यंत श्रीमंत घरात एक दुर्दैवी घटना घडली म्हणजे असे की शेठजी हृदयक्रिया बंद पडून स्वर्गवासी झाले. शेठाणीजी अगदी तारूण्यात देखील सदासर्वदा आजारीच असत. नाव लक्ष्मीबाई, तशा सुशिक्षित आणि समजदार पण अनेक प्रकारचे आजार संगनमताने त्यांचा पाठलाग करीत असत. त्यांच्यासाठी शेठजींनी ब-यापैकी संपत्ती मागे ठेवली होती, सर्व चिकित्सक व चिकित्सासाधनाची चोख व्यवस्था करूनच शेठजी स्वर्गवासी झाले होते. साधारणतः दिवसातून चारपाच स्पेशालिस्ट एकानंतर एक येत, बाईंना तपासत, प्रिस्क्रिप्शन लिहून देत आणि निघून जात. दिवाणजी हजार-पाचशेची औषधे आणीत असे. औषधांचे डोस, गोळ्या घशाखाली उतरत. एवढे करूनही 'आज मला बरे वाटते' असे शब्द बाईंच्या तोंडून कोणी ऐकले नव्हते.

गावचे डॉक्टर-वैद्य संपले, गुण येईना भारतातल्या सर्व प्रसिध्द शहरातले डॉक्टर-वैद्य संपले गुण येईना काय करावे? कुठे जावे समजेना, आजार व तक्रारी जशाच्या तशाच.

मूलबाळ नसल्याने लक्ष्मीबाई एकट्याच होत्या. संपत्ती - अलंकार, सोने नाणे मिळून कोटीच्या घरात संपत्ती होती. त्यांच्या संपत्तीचा त्यांना जसा विनियोग मार्ग होता तसा नातेवाईक-आस्थेवाईकांची स्वार्थलोलूप दृष्टीने गोड बोलून चौकशी करणे स्वाभाविकच होते.

लक्ष्मीबाईंच्या आजाराने अधिकच उचल खाल्ली नातेवाईक आस्थेने विचारपूस करू लागले, सहानुभूती दर्शवू लागले, नाही तरी दुसरे काय करीत असतात म्हणा, वेदना काही कुणाच्या कोणी विभागून घेऊच शकत नाही.

लक्ष्मीबाईंच्या सहनशीलतेची मर्यादा संपली. बाई खडबडून जाग्या झाल्या, त्यांनी मनाशी निर्धार केला की आपल्या जीवाला सुख नाही तर

ह्या संपत्तीचा काय उपयोग? माझ्या संपत्तीच्या विनियोगाचा हिशेब मला कोण विचारतो?

त्या कंबरकसून ट्रीटमेंटसाठी बाहेर पडल्या सर्व स्थावर-जंगम प्रॉपर्टीची विल्हेवाट लावली. त्याचे रुपांतर रोख पैशात (रुपयात) करून घेतले. बाईंच्या दूरदर्शीपणाची, धोरणीपणाची, हिमतीची सर्व नातेवाईकात चर्चा होऊ लागली.

भारतातील प्रमुख शहरे म्हणजे तेथील डॉक्टर-वैद्य त्यांनी प्रथम संपविले, ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, नॅचरोपॅथी, सायकोथेरपी, रिंजोपॅथी, युनानी सर्वांना एक एक संधी देऊन पाहिली - पण व्यर्थ, कांही हितचिंतकांनी लक्ष्मीबाईंना बाहेर बाधा झाली अशी नवीन माहिती पुरवली. लगेच बाईंनी भारतातील सर्व प्रसिध्द बुवा पालथे घातले. मंत्र, तंत्र, ताईत, अंगारे धुपारे करुन पाहिले. पण आराम नाही. हे सर्वर उपाय करता करता खूप खर्चही झाला केवळ दहा लाख शिल्लक राहिले.

बाईसाहेबांचे केविलवाणे, हताश-निराश जीवन नातेवाईकांना पहावेना. काहींनी शंका काढली की पतिवियोगामुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असावे, पण बाईंनी चक्क सांगितले, त्यांच्या जिवंतपणीच मी कधी त्यांची पर्वा केली नाही. विचारपूस केली नाही ती नंतर काय करणार ? ही शंका अगदीच मूर्खपणाची आहे.

नंतर बाईंच्या माहेरकडची हायली क्वालिफाईड माणसे म्हणाली - रुग्णपरीक्षा चिकित्सेच्या दृष्टीने भारत मागास आहे, लगेच बाईसाहेबांना जर्मनीला पाठविण्यात आले. तेथे सर्वश्रेष्ठ चिकित्सकाचा शोध घेण्यात आला. त्यांना असे समजले की एका वृध्द डॉक्टरांचे शहरापासून पन्नास कि.मी. दूर एक मोठे हॉस्पिटल आहे. व ते देशातील असाध्य म्हणून टाकून दिलेल्या केसेस फक्त घेतात व त्या दुरूस्त करतात. बाईसाहेब तेथे पोहोचल्या. डॉक्टरांनी त्यांना चारदोन वेळा तपासले व त्यांच्या लक्षात बाईंच्या आजाराचे खरे रुप आले. ते म्हणाले -

'बाई, तुम्हाला बरं व्हायला मुळीच वेळ लागणार नाही. एवढंच की माझी फी तुम्हाला झेपेल की नाही हे पहा.

बाई म्हणाल्या, माझे आतापर्यंत लाखो रुपये ट्रीटमेंटसाठी खर्च झाले. आता केवळ दहा लाख उरले आहेत.

काय योगायोग आहे पहा, नेमकी माझी फी देखील दहा लाखच आहे, तेवढीदेऊन टाका म्हणजे ट्रीटमेंट सुरू करतो.

बाईसाहेबांनी रक्कम देताच त्यांना आपल्या गाडीत बसवून डॉक्टर आपल्या हॉस्पिटलकडे निघाले. तेथे पोहोचताच त्यांना घेऊन डॉक्टर आपले हॉस्पिटल दाखवू लागले - हॉस्पिटलच्या एका एका दालनातल्या त्या रोग्यांची भयानक व्याधीग्रस्तता पाहून बाईंना भोवळ आली. पण त्या डॉक्टरांनी त्यांना वारंवार धीर देऊन सावरले- त्यांनी जे रोगी पाहिले त्यांचे वर्णन करणे कठीण आहे. कोणाच्या मेंदूचे, तर कोणाच्या पोटाचे, तर कोणाच्या छातीचे तर, कोणाच्या हातापायांचे अंतरंग भाग उघडे करून ठेवले होते, कोणाला डोळे नव्हते तर कोणाला अन्न-श्वास नलिका कृत्रिम बसवली होती तर काहींच्या आतड्या उघड्या दिसत होत्या, रुग्णांच्या वेदना, विव्हळणे, आक्रोश करणे, रडणे-हुंदके देणे पाहून बाई घाबरल्या व विचारात पडल्या. तेव्हा डॉक्टरांनी त्यांना विचारले. 'कां बाईसाहेब, कसं वाटतं तुम्हाला? ह्या सर्वांच्या आजारापुढे तुमचा आजार हा आजार ह्या सदरात येऊ शकतो काय?'

बाई शरमल्या, अंतर्मुख झाल्या व भारतात परतल्या. त्या भारतात परत आलेल्या पाहून सर्व संबंधित मंडळी भेटायला आली. सर्वांनी एकमुखाने विचारले, 'बाई तुम्ही इतक्या लवकर व इतक्या खडखडीत कोणत्या उपायाने ब-या झाल्या? यावर बाई काहीच बोलत नसत. पण एवढे खरे की त्यानंतर बाईंचे कांही दुखल्याचे कोणाच्या कधी कानावर आले नाही. जवळ खुळखुळणारा पैसाही संपला होता.

डॉक्टरांच्या अचूक उपायाबद्दल अधिक चर्चा नको.

# ८. अध्यात्मपंडित

आता ते महाशय सामान्य गृहस्थ राहिले नव्हते. काही काळ कुठे तरी शिकून आल्यावर स्वतःला अध्यात्मपंडित म्हणवीत होते आणि व्याख्यानाची एकही संधी सोडत नव्हते.

पण ज्यांनी त्यांना पाहिले होते त्यांना त्यांच्या पूर्वचरित्राची कल्पना होती. त्यामुळे थोडे आश्चर्य व कौतुकही होऊ लागले. त्यांनाही प्रौढांपेक्षा तरुण युवक-युवतींना उपदेश देण्यात अधिक रस वाटे. कारण त्यांचा लगेच त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसे.

चातुर्मासाचे निमित्त होऊन अनेक निमंत्रणे व व्याख्याने भोवतालच्या परिसरात होऊ लागली. पंडितजींचा संयम-आचरण आणि खाण्यापिण्यासंदर्भात अधिक कटाक्ष असे. ज्या पदार्थांच्या सेवनाने हिंसा घडते, विकार बळावतात असे कांदे, लसूण, बटाटे मसाल्याचे पदार्थ यांचा चातुर्मासात वापर नको (खाऊ नये) असे वारंवार ते सर्वांना सांगत असत.

ब-याच नवयुवकांना हॉटेलमध्ये खाण्याची सवय असल्याने फार काळ संयम ठेवणे अशक्य होई. त्या हॉटेलसमोरून जाताना मनावर ताबा रहातच नसे. सकाळच्या न्याहारीच्या वेळी तर संयम सुटतच असे.

असेच एकदा एका नवयुवकाने एका हॉटेलसमोरून जाता जाता आतील खमंग वासाने मनाची चलबिचल होऊ लागल्याने सहज आत डोकावले. तर त्यांना एका कोप-यात काहीशा अंधारात कोणीतरी परिचित असल्याचे जाणवले. जरा पुढे जावून त्या व्यक्तीकडे आश्चर्याने पाहू लागले. दुसरे तिसरे कोणी नसून तेच अध्यात्मपंडित असल्याची खात्री झाली. त्यांनी मंदिरात शेकडो भाविकांच्या समोर केलेले प्रवचन आठवले.

हा असा महान पंडित ह्या असल्या घाणेरड्या हॉटेलात घाईघाईने काहीतरी खात आहे हे पाहून नवयुवकाच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली. संतापाच्या भरात त्याने पंडिताच्या पुढ्यातील करपटलेल्या कांद्याच्या भजीची प्लेट रस्त्यावर भिरकावली.

ह्या प्रकाराने पंडित भांबावून पाणी प्यायचे विसरले. आपल्या शिष्याला समजावू लागले. ते म्हणाले, 'अरे, असा उतावीळपणा कशासाठी? तुला तत्व ओळख अजून झालेली दिसत नाही. आत्मा आणि शरीर सर्वथा भिन्न आहेत, हे कार्य शरीराचे आहे, त्याचेशी आत्म्याला काही कर्तव्य नाही. तो अखंड, अविनाशी, ज्ञातादृष्टा आपल्या जागी कायमच आहे, संताप आवर!'

हे त्या पंडिताचे निर्लजपणाचे उत्तर ऐकून त्याचा संताप अधिकच चढला, त्याने पंडिताच्या थोबाडीत अशी एक ठेवून दिली की तो पंडित चार कोलांट्या खावून शेजारच्या गटारीत जावून पडला.

सर्व सभोवतालचे लोक आश्चर्याने, औत्सुक्याने गोळा होऊन गंमत पाहू लागले. नवयुवकाने स्वतःचा राग आवरला, त्या पंडिताला गटारीतून बाहेर काढले. त्याचे कपडे स्वच्छ केले, व शांत होत म्हणाला -

'पंडितजी, रागावू नका, ही सगळी क्रीया शरीराची आहे. माझा हात आणि आपले थोबाड ह्यांचा त्या अखंड, अविनाशी आत्म्याशी काही संबंध नाही. तो तर ज्ञातादृष्टा जसा आणि जिथे आहे तेथे सुखरूप आहे. यात वाईट वाटून घेण्याचे कारणच काय?'

पंडितजी समजायचे ते समजले.

पुराणातील वांगी, कांदे, बटाटे पुराणातच रहायचे सोडून भलत्याच ठिकाणी दिसू लागली तर त्याचे परिणाम दिसणारच. आपण समजलाच आहात. अधिक स्पष्टीकरण कशाला हवे?

# ९. गत जन्माचे पाप

ते एक मध्यमस्वरूपाचे नगर होते. आसपास बरीचशी खेडी होती. भोवतालच्या खेड्यातले लोक सात्विक, सरळ व आस्तिक होते. देव-धर्म-विधिविधान मंत्र जप ह्यांच्यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच ग्रामजोशी पदावरच्या गोविंदभटजींचा प्रपंच कसाबसा चालत असे. अलिकडे वृध्दापकाळाने परिश्रम झेपत नव्हते. कष्टमय जीवन व दारिद्रय ह्यांनी त्यांच्या जीवाला कधीही उसंत मिळू दिली नाही. श्रावण आणि विशेषतः अधिक श्रावणात मात्र जरा ठीक उत्पन्न होई.

भटजींचे फलज्योतिषाचे ज्ञान त्यांच्या उपजिविकेचे एक अपरिहार्य अंग असल्याने त्यातल्यात्यात बरे होते. पण स्वतःच्या कुंडलीबद्दल ते बेफिकीर असत. कारण त्यातले योग फारसे अनुकूल नाहीत ह्याची त्यांना कल्पना होती. ते काहीही असले तरी त्यांचे चारित्र्य, सात्विकता व सौजन्य सर्वोपरी असे. कधी रागलोभ नाही. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे चित्ती असू द्यावे समाधान' हेच जणूकाही त्यांच्या जीवनाचे सूत्र.

एकदा शेषशायी भगवान विष्णू आपल्या सौभाग्यलक्ष्मीसह पृथ्वीवर फेरफटका मारण्यासाठी निघत तेव्हात्या उभयतात काही दृश्यासंबंधी जी चर्चा चाले ती मोठी उद्‌बोधक असे. आता हेच पहा ना..... गोविंदभटजींचा जीवनक्रम आणि त्या सात्विकतेशी विसंगत असे कमालीचे दारिद्रय पाहून लक्ष्मी कळवळली. न राहून ती म्हणाली, 'भगवन्, या विश्वात न्यायापेक्षा अन्यायाचेच अधिक प्राबल्य दिसते.' 'ते कसे काय?'

'तो गोविंदभटजी पहा. एवढा सात्विक सज्जन धार्मिक माणूस, दिवस रात्र देवधर्म जपण्यात मग्न असतो पण दारिद्रय मात्र त्याची पाठ सोडत नाही. ह्याला न्याय म्हणता येईल का?

देवी, चालू जन्माच्या सौजन्याची फळे पुढच्या जन्मी आणि गेल्या जन्मीच्या पापाची फळे या जन्मी भोगायची हा निसर्गाचा अलिखित नियम आहे. त्यात कोणाचीही ढवळाढवळ चालत नाही. खुद्द आमची देखील.

'मला हे मान्य नाही, आपण जगत्प्रभू जे मनी आणाल ते होईल.'

'अहो पण त्याच्या नशिबी असायला हवं ना?'

'प्रत्येक पदरात टाकल्यावर नशीब आडवे पडणार तरी कसे?'

'ते आता प्रत्यक्ष दाखवितो.' असे भगवन म्हणाले आणि एक सुवर्णमोहरांची थैली त्यांच्या मार्गात ठेऊन दिली आणि भगवन-लक्ष्मी एका आडोशाला उभे राहिले....

गोविंदभटजी एका जवळच्याच खेड्यावरून घरी परतत होते. आज उपवास असल्याने यजमानाकडे भोजन न करताच ते येत होते. त्यामुळे फारच थकवा जाणवत होता. वाटेने चालताना तोल जात होता. त्याचवेळी मनात अनेक विकल्प थैमान घालत होते. आज सकाळपासूनच त्यांच्या डोक्यात एका विचाराचे प्राबल्य गोंधळ घालीत होते. ते असे की 'आज मी सत्तरी ओलांडली आहे, दात गेले, कान बधीर होत चालले अन् डोळेही अधू होत चालले, पण जन्मभराच्या पायपीटीमुळे पाय तेवढे त्यातल्या त्यात बरे आहेत. डोळे गेल्यावर काठीची मदत घेऊनच चालावं लागेल. पण ते पूर्वसराव नसल्यामुळे जमणार नाही व अनेक अडथळयावर आदळून कपाळमोक्ष व्हायचा, त्यापेक्षा त्याचा अभ्यास आतापासूनच करायला हवा.'

असे विचार येताच त्यानी डोळे घट्ट मिटले व ते चालू लागले. वाटेत कसल्यातरी अडथळयाला अडकून पडणार होते पण सावरले व म्हणाले 'हे असं चालायचच, त्यासाठी भिऊन कसं चालणार' डोळे न उघडताच ते सरळ पुढे निघून गेले व पन्नास पाऊल पुढे गेल्यावर त्यांनी डोळे उघडले. समाधानाचा एक प्रदीर्घ सुस्कारा सोडला. वाटेत अडथळे निर्माण करणा-याबद्दल मनातल्यामनात खेद करीत घरी पोहोचले. हा सर्व प्रकार पहात आडोशाला उभे असलेल्या भगवंताने अर्थपूर्ण नजरेने लक्ष्मीकडे

पाहिले, ती लाजेने चूर होवून अधोवदन स्थितीत विचारमग्न झाली होती. तिची ती विषण्णता भगवंताला पहावेना, ते म्हणाले.....

'देवी या विश्वात कोणत्याही पदार्थाची कमतरता नाही. पण त्यासाठी पूर्वजन्मीचे पुण्य पदरी असावं लागतं. ते नसेल तर कोणी कितीही देऊ केलं तरी ते लाभत नाही. आता हेच पहा....

ह्या सुवर्णमोहरांच्या थैलीला ठोकरून जाण्याचं ह्या भटजीला काय कारण होतं? पण लाभयोग नसल्यानं त्याला ह्याच क्षणी डोळे मिटून चालण्याचा विकल्प आला, त्यानं तो लगेच अंमलातही आणला. पुढे जावून मात्र डोळे उघडले, याला दुसरं काय कारण असू शकतं?

लक्ष्मीदेवी विचारात पडल्या, जीवसृष्टीत जे काही हानिलाभ घडतात ते सर्व त्या जीवाच्या पूर्वसंचिताच फलस्वरूपच असतात. तेथे कोणाचाही हस्तक्षेप चालत नाही. हा निसर्ग नियम अनादिकाळापासून अबाधित आहे व तो अनंत काळापर्यंत तसाच राहणार आहे. हे तिला मान्य करावे लागले, सर्व विकल्प दूर झाले.

तन-मनांची शुभ प्रवृत्ती पुण्य जोडते व अशुभ प्रवृत्ती पाप पदरी बांधते. पुण्यप्रवृती ही मुक्तीसाठी दूरान्वयाने उपकारक ठरते जरी मुक्तीसाठी अंततोगत्वा अडसररूप असली तरी. शुध्दोपयोग दुरापास्त असला तरी शुभोपयोग सहज साध्य आहे ते पुण्योपार्जनाचे साधन आहे.



# १०. परमसुख

एकदा राजगृही नगरीचा अधिराजा श्रेणिक दरबारात बसला होता. सर्व सामंत दरबारात हजर होते व गप्पा रंगात आल्या असतांना एक मांस खाण्यास चटावलेले व असंयमी सामंत म्हणाले, 'आजकाल मांस बरेच स्वस्त झाले आहे.'

हे वचन अभयकुमारने ऐकले, व त्याने अशा महान हिंसावादी, जणू कांही सृष्टीतले पशु-पक्षी आपल्यासाठीच निर्माण झाले आहेत. त्यांची निष्ठूरपणाने कत्तल करण्यास कोण रोखू शकते. आपल्या खाण्या-पिण्यावर व स्वैर आचरणाचा कायपरिणाम होऊ शकतो याचा विचारही नसलेल्या, अविवेकी सामन्तास धडा शिकविण्याचा निश्चय केला.

सायंकाळी सभा संपली आणि राजा आपल्या अन्तःपुरात गेला. आणि अभयकुमार या सर्व सामंतांच्या घरी गेला तेव्हा प्रत्येकाने त्यांच्या येण्याचे कारण विचारले, अभयकुमार म्हणाला, 'अचानक श्रेणिक राजानां महारोग झाल्याचे वैद्यराजांनी सांगितले व उपाय म्हणून जर कोण्या कोमल मनुष्याच्या हृदयातील थोडे-थोडे मांस मिळाले तर हा रोग बरा होईल, तेव्हा तुम्ही सर्व राजाचे प्रिय आणि जीवाला जीव देणारे निष्ठावंत आहात, म्हणून मी तुमच्याकडे हे मांस मागण्यासाठी आलो आहे.

तेव्हा प्रत्येक सामंताने विचार केला 'मेल्याशिवाय काळजातील मास देणे कसे शक्य आहे?' ते अभयकुमारास म्हणाले, 'आमच्याबद्दल श्रेणिक राजांना काहीही न बोलण्यासाठी हे पैसे घ्या आणि आम्हाला या प्रसंगातून वाचवा.'

दुस-या दिवशी दरबार भरला, सर्व सामंत चोरासारखे येऊन आसनस्थ झाले. राजास त्यांच्या प्रकृतीबद्दल विचारपूस करू लागले. राजाने आश्चर्याने अभयकुमारकडे पाहिले. अभयकुमारने सामंतांकडून गोळा झालेली अमाप संपत्ती राजासमोर ओतली व म्हणाला, 'महाराज ! काल

आपल्या सामंतांनी सभेत म्हटले होते की आजकाल मांस बरेच स्वस्त मिळते, म्हणून मी त्यांच्या घरी मांस मागण्यासाठी गेलो असताना सर्वांनी मला पुष्कळसे द्रव्य तर दिले. पण काळजातील थोडेसुध्दा मांस दिले नाही तर मग मी विचारतो, 'ते मांस स्वस्त आहे की महाग?'

अभयकुमार म्हणाला, 'मी जे केले ते तुम्हा लोकांना त्रास देण्यासाठी नाही. फक्त बोध देण्यासाठी केले.

जेव्हा आपल्याला आपल्या शरीराचे मांस देण्याची वेळ येते तेव्हा प्रचंड भय वाटू लागते. तसेच ज्या जीवांचे मांस आपण त्या प्राण्याला ठार मारून जीभेचे चोचले पुरवितो त्या मुक्या प्राण्यांना त्यांचा जीव प्रिय नसतो काय? आपण आपला जीव वाचवण्याचा जसा प्रयत्न करतो तसे तेही बिचारे धडपडत असतात. त्यांचा जीव घेताना निर्दय होणे म्हणजे अमानवीय व्यवहारच नाही कां? सर्व सृष्टीतील बुध्दीमान म्हणून माणसाचे कौतुक होते आणि दुसरीकडे ही पशूता! या सारखी लाजिरवाणी गोष्ट कोणती? हा केवढा अधर्म आहे. जगा आणि जगू द्या ही आपली संस्कृती, साधू-संतांची ही पवित्र भूमी तेथे आपल्यासारखे हिंसक मनोवृत्तीचे लोक म्हणजे राज्यास कलंक नव्हे काय?

सा-या सामंतांनी काय बोध घ्यायचा तो घेतला. राजाधिराजाची क्षमा मागून यापुढे मांस न खाण्याची प्रतिज्ञा घेतली व परमसुखाचे कारण असलेल्या अहिंसाधर्माचा अंतःकरणपूर्वक अंगिकार केला.




# ११. पराभूत

एकदा एक भुकेलेला कोल्हा भक्ष्याच्या शोधात अरण्यातून भटकत द्राक्षाच्या बागेत शिरला. द्राक्षाचे घोस पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले. खूप उड्या मारल्या, सर्व ताकद एकवटून प्रयत्न केला. पुन्हा पुन्हा उड्या मारून थकून गेला, घामाने चिंब झाला. द्राक्षाचे घोस उंच होते. आपण तेथपर्यंत पोहोचू शकत नाही, आपला पराभव होतो आहे असा विचार येऊन आपल्याला कोणी पाहात तर नाही ना? या शंकेने सभोवार एक दृष्टी फिरवून अंग झटकून निघणार तोच....

जसा एखादा मनुष्य रस्त्यावर पाय घसरून पडतो. आपल्याला कोणी पाहिलं तर नाही ना? याचा विचार करून पटकन उठतो. आपले कपडे झटकतो, चष्मा, टोपी नीट करतो. कुठे लागले तर ते घरी जावून सावकाश पाहता येईल. पण या अवस्थेत आपल्याला कोणी पाहिलं तर नाही ना?

आपली कमजोरी, पराभव लपवण्याचा तो प्रयत्न करतो, जवळच्याच झुडपातून एक ससा हे सर्व पाहत होता तो म्हणाला -

‘काय कोल्हेमामा, काय झालं?’


‘कुठे काय? द्राक्ष आंबट आहेत एवढेच! मी उड्या मारून जवळून पाहिलं तर ती अजून कच्ची आहेत, तोडण्यास योग्य नाहीत, जरा सबुरीने घेणे शहाणपणाचे नाही का? अजून थोडे पिकू द्यावे मग खाता येईल !’

*********************

अशा सर्व कथा माणसासंबंधीच आहेत, त्याच्या स्वभावातील लबाडी, चालाखी, बेईमानी, ढोंग, जीवनापासून पलायन. या दुर्गुणांचे दर्शन घडवणाऱ्या आहेत, माणूस आपला पराभव, सुंदर अलंकारीक शब्दातून लपवण्याचा प्रयत्न करतो. आपली कमजोरी मोठ्या धूर्तपणाने, आपला

मोठेपणा, बुध्दीचातुर्य कसे आहे हे पटविण्याचा प्रयत्न करतो. पराभव मान्य करीत नाहीत.

संसारात पराभूत झालेले, आपले अपयश, लपवण्यासाठी भगवी वस्त्रे धारण करून सन्यस्थवृत्तीचे प्रदर्शन करतात आणि आपला पराभव धूर्तपणाने झाकण्याचा प्रयत्न करतात, नव्हे या वृत्तीचे महान तपस्वी, त्यागी, आत्मकल्याणाचा मार्ग, संसार त्याग करून मोक्षाप्रत नेणारा ठरवतात. पण सत्य काही वेगळेच असते.



# १२. शब्दार्थ

संध्याकाळची वेळ, शांत मंदिर परिसर, पू. आचार्यश्री आपल्या काही श्रावकांसमवेत चर्चेत दंग होते. एवढ्यात कोणी संस्कृत-प्राकृतचे जाणकार विद्वान श्रावक समुहात येवून विराजमान झाले.

आचार्यश्री ‘सोऽहं’ या शब्दाचा अर्थ व महत्त्व विषद करीत होते. सोऽहं शब्दोच्चाराने मनाची शुध्दता आणि ते कसे आत्मकल्याणकारी ठरते ह्याचे निरूपण करीत होते.

समोरच बसलेले हे विद्वान विचार करू लागले. ‘शब्दाला काय अर्थ आहे. असे कोणते आत्मज्ञान याच्या उच्चाराने प्राप्त होणार आहे? शब्द साधन आहे साध्य नव्हे, ह्या आचार्यांचा फारसा अभ्यास दिसत नाही. यांना आपल्या ज्ञानाची चुणुक दाखवावीच एकदा, म्हणजे आम्हालाही काही येतं हे तर कळेल त्यांना.’ असा विचार करून विद्वान आचार्यश्रींना मध्येच अडवून आपले विद्वत्ताप्रदर्शन करू लागले. बरेच युक्तिवाद मांडून सुभाषितांची रेलचेल करून मी कसे सर्वांना माझ्या विद्वत्तेने मंत्रमुग्ध करू शकतो हे दाखवू लागले.

थोडा वेळ स्तब्धतेत गेला, आचार्यश्री केवळ ऐकत राहिले व एकदम त्या विद्वानाकडे पाहून म्हणाले, ‘अरे, मूर्ख माणसा, गप्प बैस! आता एक शब्दही पुढे बोललास तर याद राख !!’’

अचानक, अनपेक्षित आचार्यश्रींच्या मुखातून ‘मूर्ख माणसां’ या शब्दाचे उच्चारण ऐकताच स्तंभित झालेला विद्वान पहातच राहिला.

एवढ्या श्रावकांसमोर आचार्यश्रींनी आपणास ‘मूर्ख’ म्हटले! थंडीचे दिवस असूनही विद्वान कपाळावरील घाम पुसू लागले. छाती धडधडू लागली. रागही अनावर झाला, आपण आता बोललो तर इथे हजर असलेले आचार्यश्रींचे शिष्य धरून मारतीलही, न बोलणे हिताचे.

थोडा वेळ निःशब्द शांततेत गेला. त्या विद्वान माणसास उद्देशून आचार्यश्री म्हणाले, ‘माफ करा महानुभाव.मी तर एका लहानशा, सामान्य ‘मूर्ख’ या शब्दाचा किती परिणाम होऊ शकतो हे पाहण्यासाठी म्हटले.’

‘थोडा विचार करा’, आचार्यश्री म्हणाले -

**सोऽहं सोऽहं होत नित श्वास उछास मझार!**
**ताको अरथ बिचारिये तीन लोकमे सार ।।**

अर्थात आपल्या प्रत्येक श्वासाबरोबर एक स्वयंभू नाद निसर्गतःच घुमत असतो, त्यावर सूक्ष्मतेने विचार केल्यास त्याचा जो अर्थ प्रतीत होईल तो नीट समजावून घेतल्यानंतर योग्य उमज पडला तर तीन लोकांचा सार सापडल्या इतकेच जीवन सार्थकी लागायचे आहे.


‘सोऽहं’ हा तर शब्दनाद आहे. त्याचा शब्दार्थ ‘तोच मी आहे’ असा आहे. पण तो म्हणजे कोण? हे प्रथम नीट समजावून घ्या. ‘तो’ म्हणजे सिध्द परमात्मा जो अनंतज्ञान, दर्शन, शक्ती आणि सुख या चतुष्ट्याने संयुक्त आहे. हेच माझे खरे स्वरूप आहे आणि तेच मला प्राप्त करून घ्यावयाचे आहे, ते बाहेर कुठे मिळत नाही. आजचा आपला हा आत्मा रागद्वेष मोहसंवृत्त आहे. त्याला भोवतालच्या चराचर वस्तूत ममत्व निर्माण झाले आहे. म्हणून तो अनादिकालापासून या भवसागरात गटांगळ्या खात अनंत दुःखाचे अनुभवन करीत आहे, त्याला ही जाणीवच नाही की माझे हे खरे स्वरूप नाही. ह्या सगळ्या अनर्थाचे मूळ ‘अज्ञान’ आहे.

म्हणून आता एकच ध्यास, एकच ध्यान, एकच चिंता, एकच मनन, एकच उच्चार, एकच ध्येय, एकच आदेश, एकच उपदेश आणि तो म्हणजे -

‘हे सिध्द भगवान, आपण आहात तोच म्हणजे तसाच मी आहे, अनादिकालापासून ज्याचे विस्मरण झाले ते आज सुदैवाने सापडले, हा एकमेव एक गुरुमंत्र अमुल्य आहे.

आता प्रत्येक श्वास-उच्छ्वासाचा अर्थ मला उमगला आहे, तो म्हणजे सोऽहं! तोच परमात्मस्वरूप असा मी आहे.

एवढे सांगून आचार्यश्री स्वाध्यायासाठी गमनकर्ते झाले. हे सर्व पाहून-ऐकून विद्वान आचार्यचरणी लीन झाला.



# १३. दुःख हरता, सुख करता माझा मीच

एका नगरीत एक ज्येष्ठ उद्योगपती आपल्या समाधानी, सुखी जीवन व आपल्या परिवाराचे गुणगान करीत होते. भेटायला येणाऱ्या समवयस्क मित्रपरिवारांकडे तोंड भरून कौतुक करीत असत. आजपर्यंत व्यापारात मिळवलेली प्रतिष्ठा, स्थावर-जंगम मालमत्ता, सुस्वरूप पत्नी, आज्ञाधारक, निर्व्यसनी मुले, घरात आलेल्या सुना सुशिक्षित, आदरातिथ्य करणाऱ्या, सुसंस्कार संपन्न नातवंडं, सगळं काही मनासारखं आणि परिपूर्ण असल्याचे समाधान त्यांच्या वारंवार कौतुकातून ओसंडून वाहात होते.

आज वयाची पंचाहत्तरी गाठली, मोठ्या थाटात सर्व कुटुंबियांनी वाढदिवस साजरा केला. हार तुरे, फोटो, मेजवानी, रोषणाई लखलखाट संध्याकाळ पर्यंत ओसरला, थोडे शांत झाल्यावर आरशात आपल्याकडेच पहात निसर्ग आपले कार्य चोख बजावत असल्याचे जाणवत होते. आता चष्मा, काठी, बचाळी, श्रवणयंत्र हे अगदी सगेसोयरे बनू लागले. मित्र परिवार 'काय म्हणते तब्येत? रक्तदाब, शूगर, सर्व नॉर्मल आहे ना?' अशी चौकशी आस्थेने करू लागली. उद्योगपतीही आपल्या व्याधींना कुरवाळत कौतुकाने आपल्या परिवारातील सेवा-भाव किती सुखमय आहे ते केवढ्या आदरातिथ्याने, सन्मानाने विचारपुस करतात हे सांगताना गहिवरून येत.

एकदा - का शुगरचा प्रवेश झाला तर तो अखेरपर्यंत अत्यंत निष्ठेने आपला एक एक अवयव संपुष्टात आणण्याचे काम करीत असतो. उद्योगपतींचेही तसेच झाले. अलिकडे त्यांच्या डोळयांनी दिसायचे कमी होऊ लागले. घरातील वस्तू, फर्निचर अडथळे निर्माण करू लागले, चालणे न ठोकरता अशक्य होऊ लागले. तेव्हा नातवाने त्यांच्या हातात काठी सोपवली, मुलेही आस्थेने म्हणू लागली, 'बाबा, एकदा डोळयांचे ऑपरेशन करून टाका, सर्जन आपल्या परिचितच आहेत, सकाळी ॲडमिट-संध्याकाळी डिसचार्ज, काहीही त्रास होणार नाही.

उद्योगपतींच्या डोळयात अश्रू आले, कंठ दाटून आला, केवढी काळजी घेतात माझी मुलं! खरचं मी किती भाग्यवान आहे! हे प्रेम-जिव्हाळा-तत्परता पाहून त्यांनी संध्याकाळी घरासमोरील बागेत आरामखुर्चीवर बसून त्यांच्याबद्दलचे हृदगत व्यक्त करत म्हणाले -

मुलांनो, आता मला डोळयांची काय आवश्यकता आहे? माझी ही प्रेमळ चार मुलं म्हणजे आठ डोळे, चार सूना, आठ डोळे, माझ्या मालकीणीचे दोन डोळे चार नातवंड त्यांचे आठ डोळे असे सव्वीस डोळे असताना मला डोळयांची आवश्यकता काय? हे शब्द ऐकून सर्वांनी निःश्वास टाकला व आपआपल्या कामात गुंतले.

अघटित म्हणा किंवा दुर्दैव म्हणा, कशी कोणास ठाऊक उद्योगपतींच्या घराला त्याच रात्री आग लागली. सुरक्षितता मिळवण्यासाठी, बचावासाठी सर्व घाईने बाहेर पडू लागले, आग आटोक्याबाहेर जात असलेली दिसू लागली, रात्रीची वेळ असल्याने मदत कार्यही तातडीने होऊ शकत नव्हते, सर्वजण घाबरलेले होते.

तेवढ्यात नातू ओरडला 'आजोबा कुठे आहेत? बाहेरून आकांत करून आजोबा, आजोबा ही आर्त हाक कानी पडत होती.

उद्योगपतींचा नाइलाज होता, डोळयाने दिसत नव्हते आणि पायाने चालता येत नव्हते. आता आपण आकांत करून काय उपयोग?

कोणीही कोणाचे नाही, जे कांही आपल्या हाती, अवाक्यात आहे तोपर्यंतच आपल्या कल्याणाचा मार्ग आपणच शोधला पाहिजे, इतरांवर (दैवावर) विसंबून आत्मघात ओढवून घेण्यासारखेच नाही का?

आपला जीव धोक्यात घालून कोणी आपल्याला वाचवतील ही अपेक्षा खोटी आहे, 'कठीण समय येता कोण कामास येतो?'

आपणच आपल्या सुख-दुःखाचे धनी आहोत, याची जाण वयाच्या पंचाहत्तरी नंतर होऊन काय उपयोग?

# १४. सुमती

प्रत्येक जीव हा आपल्या भवितव्याचा शिल्पकार असतो. तो कसा? पाहूया!

प्रत्येक जीव ज्या प्रमाणे विचार करतो त्या प्रकारचे पुण्य पाप त्याच्या नशिबी जोडले जातात. स्वतःचे व इतरांचे कल्याणाचा भाव मनी असणे, इतर जीवांना दु:ख न होईल अशी संयमशील वागणूक ठेवणे ह्या गोष्टी त्याच्या स्वत:च्या स्वाधीन असतात. यासाठी फारशी बुध्दिमत्ता किंवा संपत्ती हवी असते असे काही नाही.

पूर्व संचीताप्रमाणे जी काही बरी-वाईट, कमी-जास्त सांपत्तिक-बौद्धिक सामुग्री लाभली असेल त्यात संतुष्ट राहून सदविचार आणि शुभचिंतनाच्या प्रयत्नाने आपले सुखद भविष्य घडवीत राहणे प्रत्येक जीवाचे परम कर्तव्य ठरते. त्याचा लाभही पुढच्या जन्मी होईल यात काही शंका नाही. पण खूपवेळा हा लाभ ह्या जन्मीच मिळूही शकतो. आपल्या भोवताली वावरणारी सात्विक, आनंदी व मंदकषायी माणसे आरोग्य आणि ऐश्वर्य संपन्न पहावयास मिळतात.

एकदा एका गुरूने आपल्या शिष्याला एक पहिल्या प्रतिच्या स्वरूपसुंदर पुरुषाला शोधून आणण्याची कामगिरी सोपवली. स्वपरहित चिंतेत सतत व्यस्त असणा-या एका सत्पुरुषाच्या मुद्रेवरचे ओसंडून वाहणारे तेज पाहून त्या पुरुषाला गुरुसमोर हजर करण्यात आले. गुरूने शिष्यास योग्य कामाची शाबासकी दिली.

सदविचारमग्नतेचा हा पुरुष परिपाक असल्याचे पटवून दिले.


काही वर्षांनंतर एका अत्यंत कुरूप पुरुषाची निवड करण्यास त्याच शिष्यास सांगण्यात आले. तेव्हा राजाच्या कैदेतील एका कुरूप व भेसूर पुरुषास त्याने गुरुसमोर उभे केले.

अधिक चौकशी व निरीक्षणानंतर असे समजले की, अत्यंत रूपसुंदर म्हणून एकेकाळी आपण ज्याची निवड केली होती तोच हा मनुष्य होता. कर्मधर्म संयोगाने किंवा कुसंगतीमुळे त्या सदविचारी माणसाचे रुपांतर सप्तव्यसनी, दुष्प्रवृत्त व्यक्तीत झाले आणि त्याचाच परिणाम त्याच्या मुद्रेवर झाला आणि तो विद्रूप दिसू लागला. तेव्हा या घटनेचा निष्कर्ष असा झाला की, माणसाला प्राप्त होणारे सुंदर स्वरूप किंवा कुरूपता हे केवळ त्याच्या अंत:करणात चालू असणा-या शुभ - अशुभ विचारांचा, प्रवृत्तींचाच परिणाम असतो.

जेथे सुमती, सदविचार, शुभचिंतन असेल तेथे संपत्ती आणि जेथे दुर्मती, दुष्टविचार, अशुभचिंतन असेल तेथे विपत्ती असतेच असते.

**जहाँ सुमति तहाँ संपत्ति नाना**
**जहाँ कुमति तहाँ विपत्ति निदाना**

**भावार्थ** - जेथे सदाचार, हितचिंतन, शुभ परिणाम ह्यांचा सदासर्वदा वास असतो तेथे संपत्ती आपोआप चालत येते. या उलट तेथे द्वेष, दुष्टपणा अशुभ परिणती यांचे थैमान असते तेथे अनेक संकटे आणि दारिद्र्य यांचे प्राबल्य दिसते. म्हणून ‘सुमती’चा क्षणभर देखील विसर न पडावा हे आपले प्रथम कर्तव्य नव्हे काय?



# १५. अभिरुची

त्रिलोक संचारी महामानव श्री. नारदमुनी मध्यलोकांतील काम संपवून ऊर्ध्वलोकांकडे प्रयाण करू लागले, जरा उंचावर पोहोचताच त्यांनी खाली दृष्टी टाकली आणि तेथेच थांबले. त्यांनी जे दृश्य पाहिले त्यामुळे त्यांचे करुणाकोमल हृदय हेलावले.

कसले दृश्य होते ते?

एक डुक्कर एका गटारात लोळता-लोळता पूर्णपणे तळाशी गेले मुनी चिंतेत पडले आता हा प्राणी हयातच बुडून मरणार तर नाहीना? अशी भीती त्यांना व्याकूळ करून गेली. ते जागच्या जागीच उभे राहिले व त्या गटाराकडे नजर खिळवून पुढच्या घटनेची परिणती आजमावू लागले.

एव्हढ्यात ते ग्रामवराहाचे प्रचंड धूड वर आले सभोवतालच्या परिसराकडे त्यांनी एक चौफेर नजर टाकली व पुन्हा डुबकी मारणार एवढ्यात त्यांची नजर अंतराळात स्थिरावलेल्या नारद मुनिश्वरांकडे गेली.

मुनिराजांची आशंकित मुद्रा पाहून सुकर महोदय विचारते झाले.

प्रणाम मुनिराज, का आपण अशा भयभीत मुद्रेने मजकडे पहात अहात?

मला वाटलं - तुम्ही प्राणसंकटात आहात!

छे! छे! हा तर माझा रोजचाच कार्यक्रम आहे.

त्याशिवाय परमोच्च आनंदाचा दुसरा उद्योगच नाही.

स्वर्गसुख का काय म्हणता तुम्ही - त्याचा हा स्वाद असावा अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.

सुकर श्रेष्ठ, तुमची कल्पना, तुमच्या दृष्टीने कदाचित बरोबर असेलही. पण योनिपरत्वे व व्यक्तीपरत्वे सुखाच्या कल्पना वेगवेगळया असू शकतात.

काय म्हणतो मी? आलं काय ध्यानात?

हं आले थोडेसे पण आमच्या सुखाची कल्पना इतरांना येणं दुरापास्तच, बरं ते जाऊ द्या. आपण वर कुठे निघालात?

मी निघालो स्वर्गात

मला ही घेऊन चला ना

वा! का नाही? चला की!

पण तेथे आमची सगळी सोय होईल ना?

स्वर्गच तो, तिथं काय कमी असणार?

तसं मोघम नको, इथंच सर्व खुलासा झालेला बरा.

कसला खुलासा हवा तुम्हांला?

आमच्या नेहमीच्या आहार विहाराची तिथं काय सोय?

स्वर्गातल्या देव देवतांना निहार नसतो. त्यामुळं तुमची कुचंबणा होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्या ऐवजी अमृत प्राशन करून ती गरज भागवता येईल.

ते राहू द्या, आमचं अमृत आम्हांला व तुमचं तुम्हांला लखलाभ असो. पण शंका अशी की, मध्यलोकांतील माणसांप्रमाणे तिथंही सेप्टिक वगैरेची भानगड जाऊन पोहोचली की काय?

छे! छे! तो प्रश्नच तिथे उदभवत नाही.

अस्स, मग मात्र आम्हांला त्याशी कर्तव्य नाही. जिथं साध्या आहार विहाराची देखील सोय नाही त्याला आम्ही स्वर्गा ऐवजी नरक म्हणणेच पसंत करू.

बरं मग मी चलू आता?

आवश्य, शुभास्ते पंथान: काय ही जीवाची अभिरुची आणि काय ह्या स्वर्ग नरकाच्या कल्पना. एकाला जो स्वर्ग वाटतो तोच इतरांना नरक भासतो. भिन्नरुचीहि लोक: म्हणतात तेच खरे, ठीक आहे.

आपण आता मार्गस्थ व्हावे, मला ह्या आनंदसागरात अद्याप ब-याच डुबक्या मारायच्या आहेत. हयात बुडून मरण्याची आशंका मनातून काढून टाकावी मुनिराज - आमचं हेच परम सुख आहे.

वराहाशी एवढा वार्तालाप होताच नारदमुनि महाराज कसल्यातरी विचारतंद्रीत स्वर्गारोहण करते झाले.

त्यांच्या विचारतंद्रीचा मागोवा घेता असे आढळले की -

जीवमात्र पूर्वसंचिताच्या फलस्वरूप चौ-यांशी लक्ष योनिपैकी एखाद्या योनीत जन्म घेतो, त्या त्या जीवजाती मधील माता पित्यांची बौद्धिक पातळी, खाद्यपेयांची अभिरुची त्याला प्राप्त होते. त्यातच तो परमोच्च सुखाचे अनुभवन करतो. इतर काही नैतिक अध्यात्मिक मुल्यांचा प्रादुर्भाव तेथे संभवत नाही.

पण मानव त्याला अपवाद आहे. देश काल परिस्थितीची विषमता व विपरीतता पुरुषार्थाने बाजूस सारून तो आपली अभिरुची बदलवू शकतो. पण हे क्वचित घडते.

बहुभाग मानव हे पशूप्रमाणेच अमोल मानव जीवन गतानुगतिकतेने व्यतीत करतात.

कोणाची अभिरुची राजकारणात, कोणाची विघ्वंसक कार्यात तर कोणाची चौर्यादि पापाचरणात त्यांना त्यातील निमज्जनात जे स्वर्ग सुख लाभते त्यापासून विचलित केले मुळीच आवडत नाही. ह्या रागद्वेषाचे गटार म्हणजेच खरे सुख आणि प्राप्त जन्माचे सार्थक अशी त्यांची कल्पना असते.

त्यांच्यापासून त्यांना मुक्त करणे हे पुष्कळदा अशक्यच ठरते. जे महामुनी नारदांना शक्य झाले नाही ते आपण आपल्या उपदेशाने साध्य करू शकू अशी महत्वाकांक्षा सामान्य शक्तीच्या महाभागांनी बाळगणे म्हणजेच शक्तीचा व वेळेचा अपव्ययच ठरेल. ही जाणीव असूनही थोर महात्मे आपले कर्तव्य करुणा बुद्धीने करीतच आले आहेत व करीतच राहणार आहेत, जगाच्या अंतापर्यंत. एवढंच काय तर भिन्नरुचीहि लोक: म्हणजे कोणाची आवड गटार तर कोणाची आवड अमृत.



# १६. परिचय

प्रभू रामचंद्र बंधू लक्ष्मण आणि धर्मपत्नी सीतेसह वनवासातले आपले दिवस अरण्ये तुडवीत घालवीत होते.

प्रखर अध्यात्मिक जागृती, पूर्वसंचिताची अनिवार्यता आणि लौकिक कर्तव्यतत्परता ह्या त्रयीमुळे त्यांचा अरण्यवास देखील त्यांना यातनेचे कारण ठरू शकले नाही.

घनदाट वनश्रींची शोभा पहावी, रानफळे चाखावी रानफुलांच्या मंदसुगंधित वा-याने सुखवावे व आढळणा-या वन्य पशुपक्षांच्या निरागस, सात्विक जीवनाची दिनचर्या पाहून त्यात जीव रमवावा असा त्यांचा उपक्रम असे.

चौदा वर्षांपैकी दहा वर्षे लोटली होती पण त्यांच्या वृत्तीत काहीच फरक पडला नव्हता. कारण स्थितप्रज्ञतेमुळे, सुख-दुःख, जय-पराजय, काच-कंचन, महाल-स्मशान, राजवैभव-अरण्यवास हयात भेद मानण्यापलीकडे ते पोहोचले होते.

भ्रमता-भ्रमता एक विशाल सरोवर त्यांच्या नजरेस पडले, त्याचा परिसर समुद्रासारखा शांत असला तरी सागराच्या वैगुण्यापासून ते सर्वथा मुक्त होते.

शीत-मधुर जल, फुललेल्या कमळांची विपुलता, त्याचा सुखद-सौरभ, त्यात स्वच्छंदाने विहार करणारे जलचर ह्यामुळे एक आगळीच भव्यता आणि रमणीयता निर्माण झाली होती.

त्या निसर्गसौंदर्याने भारावून सरोवराच्या काठाशी प्रभू एका उंच जागी विसावले. ते पाहून त्यांचे शेजारीच बंधू लक्ष्मण आणि सीताही विसावली.

सरोवराच्या काठावर थोड्या-थोड्या अंतरावर अनेक बगळे ध्यानमग्न अवस्थेत उभे होते. एकाच जागी फार वेळ थांबूनही कार्यभाग साधलाच नाही तर ते हळूहळू एकएक पाऊल सावधगिरीने टाकीत. प्रत्येक पाऊल टाकतांना पाण्याची खोली व आतला तळ ह्याचा अंदाज घेण्यासाठी ते चाचपडत व गाळात पाऊल फसण्याची संभावना नाही हे आजमावून पहात. ते दृश्य अनिमिष नेत्राने पाहिल्यावर प्रभुराम अंतरी उमगले, ते लक्ष्मणाला हालवून म्हणाले -

**पश्य लक्ष्मण पंपायां बको S यं परमधार्मिक: |**
**शनै: शनै: पदं धत्ते जीवांना वधशंकया ||**

पाहिलंस लक्ष्मणा, जरा बरकाईनं त्या बगळयाच्या हालचालीकडे बघतरी आपल्या पदन्यासामुळं खालच्या जीवांची हिंसा होऊ नये म्हणून बगळा कसा हळूहळू पाऊल टाकीत आहे, ही त्याची जीवरक्षणाची सावधता पाहून त्याच्या परम धार्मिकतेची ओळख पटते.

हे प्रभूंचे शब्द तेथेच पाण्यात रेंगाळणा-या एका मत्स्यकुटुंब प्रमुखाने ऐकले व त्याला प्रभूंच्या अतिरेकी सौजन्यशीलतेची कीव आली, न रहावून तो पाण्याबाहेर तोंड काढून प्रभूंना उच्चस्वराने म्हणाला -

**सहवासी विजानीयात, सहवासी विचेष्टीतम |**
**बक: किं वर्ण्यते राम ए नाहं निष्कुलीकृत: ||**

प्रभू, काय हा भोळेपणा!

आम्ही या सरोवरातील सहवासी आहोत, रात्रंदिवस आम्ही परस्परांना चांगले ओळखतो. एवढंच नव्हे तर नीट ओळखून आहोत. ही बगळयांची जात जी अत्यंत हळुवारपणे पदन्यास करते ती जीव वधाच्या भीतीने मुळीच नाही तर चिखलात पाय फसू नये किंवा वेलीत पाय अडकू नये ह्या भीतीने, तो प्रत्येक पाऊल चाचपडत व पाण्याखालच्या जमिनीचा अंदाज घेत स्वतःच्या सुरक्षिततेसाठी असा सावकाश पाऊल टाकतो. जीवहिंसा टाळण्याचा त्यात सुतराम संबंध नाही. तसे असते तर त्याने

आमचे मत्स्यकुल नष्ट करीत आणले नसते. आता केवळ मीच तेवढा शिल्लक राहिलो आहे. आणि तो ही केवळ आपला गैरसमज नाहीसा करण्यासाठीच.


एवढे भाषण होताच जवळच्या बगळयाने झेप घेऊन त्याला चोचीत पकडले व प्रभूसमोरच गट्ट केले. प्रभू अवाक् झाले व उठून चालू लागले.

अति सौजन्य प्रकृतीमुळे दुष्टांनाही सुष्ट समजणे हे संत सज्जनांचे ब्रीद असले तरी ज्याचा त्याचा मूळ स्वभाव कधी बदलत नाही.

दुष्ट प्रवृत्तीचे जीव जेव्हा उघड-उघड दुष्टपणा करतात तेव्हा त्याचे फारसे काही वाटत नाही पण जेव्हा ते संत सज्जनांचे नाटक वठवून भोळया जीवांना नाडतात तेव्हा दुष्टाच्या सोबतच मायाचारामुळे ते पाप शतपटीने वाढते.

आपल्या दैनंदिन व्यवहारात अशा बगळयांच्या मायावी वागण्यापासून सावध रहावे व त्यांच्या चिरसहवासी जणांकडून त्यांचे सत्यस्वरूप समजून घेऊन त्यांचेपासून चार पाऊले दूर रहावे.

- पूर्व प्रसिद्धी - मासिक **सन्मती**



# १७. सव्वाशेर

एका गावांत एक वृद्ध शास्त्री रहात होते. पंचक्रोशीतील खेड्यांमधून त्याची भिक्षुकी चांगली चाले. अनेक कारणांसाठी ते प्रसिद्ध होते. त्यांच्या पारंपारिक व्यावसायात ते रात्रंदिवस मग्न असत. त्यांच्या धंद्याचा त्यांना अभिमान वाटे व आपल्या एकुलत्या एक मुलाने हाच व्यवसाय त्यातील वैशिष्टयासह चालू ठेवावा असा त्यांचा आग्रह होता.

सर्वत्र पितरांना शांत करण्याचे पर्व चालू होते. बहुजन समाजाची अशी श्रद्धा असते की, त्या पर्वात पोटभर जेवणारा ब्राम्हण लाभला तर पितर तृप्त होतात. त्यामुळे ह्याकामी शास्त्रीबुवांचा अनुक्रम कधीच दुसरा लागला नाही, पंचपक्वान्नासोबतच ते एका बैठकीत वीस-पंचवीस लाडू सहज संपवीत. त्यामुळे भाविकांची त्यांनाच बोलावण्यासाठी अत्यंत चढाओढ लागे.

आज चार ठिकाणी आमंत्रणे त्यांना व चार ठिकाणी त्यांच्या मुलाला होती शास्त्री बुवा अत्यंत दक्षतेने चारही आमंत्रणे पूर्ण करून नुकतेच आडवे झाले होते. तेवढ्यात चौथ्या आमंत्रणाबद्दल मुलगा अळम-टळम करतो आहे हे त्यांच्या लक्षात आले व ते त्याचेवर उखडले त्यांनी त्याचे तोंडावर एक रामबाण सुभाषित लगेच फेकून मारले व त्याची वटवट बंद केली ते म्हणाले -

**परान्नं प्राप्य दुर्बुद्धे मा प्राणेषु दयां कुरु |**
**परान्नं दुर्लभं लोके प्राणा: जन्मति जन्मति ||**

अरे, दुर्बुद्ध माणसा, परान्नसेवनाने प्राण कासावीस होतात म्हणून त्यांना दया दाखवू नका, ह्या विश्वात परान्न दुर्लभ असते, प्राण तर अमर आहेत ते जन्मोजन्मी सोबतच असतात.

यावर मुलगा तरी काय उत्तर देणार शास्त्री बुवांचा युक्तिवाद बिनतोड होता हे कोण अमान्य करील?

शास्त्री बुवांचा हात धरणारा ह्या बाबतीत तरी कोणी नाही. ह्या कीर्तीमुळे शास्त्री बुवांना देखील थोडा-फार गर्व झालाच! आणि त्या तो-यात ते वागू लागले.

बहुतेक शास्त्र्यांना असते तसे थोडे वैद्यक व ज्योतिष विषयक ज्ञान त्यांना होते. वेळप्रसंगी आपल्या विद्वत्तेची छाप समोरच्या अज्ञानी लोकांवर पाडण्यासाठी संस्कृत वाक्य किंवा सुभाषित ते अशा ठसक्यात म्हणत की, त्यांच्या त्या शब्दोच्चाराने सर्व प्रभावित होऊन त्यांचा महिमा गत असत.

आज त्यांना शेजारच्या पाच कि. मी. वरील एका खेड्यातील प्रमुखाकडे सत्यनारायणाची पूजा घालण्याचे आमंत्रण होते. साधारण दुपारी तेथे पोहोचावे. पहिले जेवण चारीठाव रिचवावे, नंतर संध्याकाळी कथा संपवून दुसरे जेवण पदरात पाडून चांदण्यारात्री बैलगाडीतून घरी परतावे असा मनात विचार करून चार कि. मी. गेले. दिवस आश्विन महिन्याचे होते. उन्ह कडाडले, शास्त्री घामाघूम होऊन एका वृक्षाखाली विसावले.

जवळच्याच एका वृक्षाखाली एक आडदांड शेतकरी शिदोरी सोडून जेवू लागला, लागोपाठ पाच भाकरी फस्त करून पाणी घटाघटा प्याला. शिदोरी गुंडाळून आडवा झाला. शास्त्री बुवा विचारात पडले. एक एक भाकरी पाऊण इंच जाड व पराती एवढी. बापरे! काय प्रचंड आहार! ४०-५० लाडू तर सहज संपवेल हा! ते पाहून शास्त्रींना पुन्हा घाम फुटला. थोड्या वेळाने शेतक-याला जवळ बोलावून एक सुभाषित ऐकवले -

**अजीर्णे भोजनं वारि जीर्णे वारि फलप्रदम् |**
**भोज्यमध्ये S मृतं वारि भोजनान्तेतु तद् विषम् ||**

शेतकरी म्हणाला सरळ मराठीत अर्थ सांगा की, तेव्हा शास्त्री म्हणाले, जेवणाच्या शेवटी प्यालेले पाणी विषाप्रमाणे बाधक होते. पण मध्यावर प्यालेलं पाणी अमृताप्रमाणे गुणकारी ठरते.

मग आता हो कसं? शेतकरी

ते आता तुझं तू बघं. तू मरू नये म्हणून मी सांगितलं.

मरायचं नाही मला एवढ्यात, त्या पाण्याचं अमृत करतो आता. असे म्हणून त्याने पुन्हा शिदोरी सोडली, संध्याकाळच्या पाच भाक-या हा हा म्हणता फस्त केल्या, ते पाहून शास्त्री बुवांना पुन्हा घाम फुटला.

आपला २५ लाडूंचा विक्रम सहज मोडू शकेल असा माणूस आढळल्याने त्यांचा नशा उतरला ते शीघ्रगतीने आपल्या घरी पोहोचले. बरीच रात्र झाली होती तरी त्यांनी आपल्या सुपुत्राला उठवले. पाहिलेले दृश्य वर्णन करून सांगितले व असा आदर्श आपल्या डोळयासमोर ठेवण्यास प्रेरणा दिली.

तात्पर्य - हेच की, कोणीही कशाचाही गर्वभार वाहू नये, जगात शेराला सव्वाशेर कुठेना कुठे आढळतोच.

- पूर्व प्रसिद्धी मासिक **सन्मती**



# १८. तारतम्य

मी एक गोष्ट ऐकलीय, एका माणसाला पन्नास रुपयांची गरज होती. म्हणून त्यानं परमेश्वराला पत्र लिहिलं, पण त्याला परमेश्वराचा पत्ता माहित नव्हता. म्हणून त्यानं लिहिलं...

प्रति,
परमपिता परमेश्वर,
द्वारा पोस्ट मास्तर

आणि पत्र पाठवून दिलं. त्याला वाटलं पोस्ट मास्तरांना पत्ता नक्कीच माहित असणार. मास्तरांनी पत्र फोडलं. असलं कसलं पत्र आणि कुणाला पाठवलंय. तर परमेश्वरा. त्यांना पत्र पाठविणा-याबद्दल सहानुभूती वाटली. नक्कीच हा माणूस अडचणीत असणार, पत्रात त्यानं लिहिलं होतं की, त्याची आई मरायला टेकलीय आणि त्याच्या जवळ अजिबात पैसा नाही. त्याला नोकरीही नाही. जेवण आणि औषध ह्यासाठीही त्याच्याजवळ पैसे नाहीत. एकदा त्याला पन्नास रुपये मिळाले तर तो पुन्हा कधीही पैसे मागणार नाही.

पोस्ट मास्तरांना त्या माणसासाठी काहीतरी करावसं वाटलं. आपण कांही केलं नाही तर तो निराश होईल. पण पोस्ट मास्तर स्वतः काही श्रीमंत नव्हते. म्हणून त्यांनी ऑफिसमधील सर्व कर्मचा-यांना थोडे-थोडे पैसे देण्याची विनंती केली. असे पंचेचाळीस रुपये जमले. पोस्ट मास्तरांना वाटलं चला, काहीच नसण्यापेक्षा बरं! त्यांनी ते पैसे त्या माणसाला पाठवून दिले.

मनीऑर्डर मिळताच तो माणूस नाराज झाला आणि देवाला म्हणाला, पुढच्या वेळेला पैसे पाठवतांना पोस्टामार्फत पाठवू नको. कारण त्या लोकांनी आपलं कमिशन कापून घेतलं, पाच रुपये.

ह्या विशाल ब्रम्हांडाचं नियंत्रण ईश्वर करू शकत नाही. म्हणजेच ईश्वराचे अस्तित्व नाहीच. आंतरिक तारतम्य, सुसंगती असल्याशिवाय, एका जिवंत देहाप्रमाणे आतून स्वतःशीच नियंत्रण ठेवणारी एकता असल्याशिवाय हे शक्य नाही. अनंत काळासाठी कुणीही बाहेरून ही व्यवस्था नियंत्रित करू शकत नाही.

ह्या अस्तित्वाची व्यवस्था बाहेरून होऊ शकत नाही. हे सारे काही कल्पनेबाहेरचं आहे. कारण ईश्वर कष्ट घेऊन ही व्यवस्था किती दिवस करील?


कधी तो थकेल आणि रजाही घेईल, त्याच्या रजेत काय होईल? तो थकला असेल, झोपला असेल तेव्हा काय होईल? गुलाब फुलणार नाहीत. तारे चुकीच्या मार्गाने जायला लागतील सूर्य चेंज म्हणून पश्चिम दिशेने उगवण्याची शक्यता आहे.

नाही, बाहेरून हे शक्य नाही. ईश्वर ही कल्पना पूर्णपणे विसंगत व निरर्थक आहे. कुणीही बाहेरून या सृष्टीच्या अस्तित्वावर नियंत्रण ठेवू शकत नाही. एकच शक्यता आहे आणि ती म्हणजे आंतरिक अस्तित्व ही एक जिवंत संपूर्णता आणि समग्रता आहे.



# प्रा. प्रवीण हेमचंद्र वैद्य

M. A. (Marathi), B. Ed.



- मूळ जन्म गांव- कारंजा (लाड) जि. वाशिम

- Mob : 9766581353

- नागपूर विद्यापीठाचे ग्रॅज्युएशन
- शिवाजी विद्यापीठ - एम.ए. (मराठी)
- बी. एड्.

- श्री बाहुबली विद्यापीठ द्वारा संचलित हायस्कूल व ज्युनि. महाविद्यालयात अध्यापन सेवा सन २००६ मध्ये स्वेच्छा निवृत्ती

- सहसंपादक -
  सन्मति मासिक, बाहुबली (कुंभोज)
  मासिक महापुरुष, जयसिंगपूर

- लेखन - सन्मति, सार्वधर्म, प्रगति जिनविजय, रत्नत्रय, अरिहंत, श्राविका इत्यादि नियतकालिकांतून उद्‌बोधक कथा, अध्यात्म व वैचारिक स्वरूपाचे लेखन

- विविध विषयांवर भाषणे व कथाकथन इत्यादि...


- **कथासंग्रह - उद्‌बोधन**
- **मूल्यः ६०/-**
- **कवितासागर प्रकाशन, जयसिंगपूर**
- ०२३२२-२२५५००, ९९७५८७३५६९
- KavitaSagarpublication@gmail.com